cmyk

## संपादकीय

### देवा भाऊंची फाजील लाडाला टाच !

देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांना शिस्त लावण्याचा आणि त्यासाठी पाऊले टाकायला प्रारंभ केला आहे. खरे तर या गोष्टीचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे पण त्यामुळे काही आमदार, मंत्री व पक्ष नाराज दिसत आहेत. या मंडळींच्या राजी-नाराजीपेक्षा महाराष्ट्र हित, शिस्त व नियम आणि संकेतांचे पालन महत्त्वपूर्ण आहे आणि ते केलेच पाहिजे आणि फडणवीस यांनी ते मनावर घेतलेले दिसते यात त्यांना कितपत यश मिळते हे बघायचे पण प्रारंभ झाला आहे.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२९९ | शुक्रवार, दि.२१ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये







# शक्तिपीठ महामार्ग हाणून पाडणार

## कृती समितीच्या बैठकीत निर्णय, १२ मार्चला १२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा आझाद मैदानावर मोर्चा

कोल्हापूर । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा शक्तिपीठ महामार्ग कुठल्याही परिस्थितीत हाणून पाडणार, तसेच शक्तिपीठ महामार्गाविरोधात १२ मार्चला १२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा आझाद मैदानावर मोर्चा काढण्याचा निर्धार कोल्हापुरात शक्तिपीठ महामार्ग कृति समितीच्या बैठकीत घेण्यात आला. ही बैठक आमदार सतेज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. दरम्यान, कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विरोधामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर स्थगित करण्यात आलेल्या शक्तिपीठ महामार्गाच्या कामाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दाखवल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत.**




शाहू स्मारक भवन येथे शक्तिपीठ महामार्गविरोधी कृति समितीच्या वतीने बारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या बैठकीचे आयोजन गुरूवार दि.२० रोजी करण्यात आले होते. यावेळी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांनी आमची इंचभरही जमीन देणार नाही, वाडवडिलांकडून वारसा हक्काने आलेली जमीन सोडणार नाही, पिकाऊ शेतजमीन ही आमची भूमी आई आहे, अशी शपथ घेतली. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात सूतोवाच केले होते. महामार्गासाठी जमीन संपादनाचे काम सुरू केले आहे; मात्र हा विकासाचा मार्ग नसून शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा मार्ग आहे. हा मार्ग अंबानी, अदानी यांचा विकास करणारा मार्ग आहे. ७६ हजार कोटींचा हा प्रकल्प कोणाच्या विकासाचा आहे. शेतकऱ्यांचे हित दिसत नाही ठेकेदारांचे हित दिसते. त्यामुळे हा मार्ग कुठल्याही परिस्थितीत होऊ देणार नाही, अशी भूमिका उपस्थित असलेल्या सर्व शेतकऱ्यांनी मांडली. काही वर्षांपूर्वी आमच्या शेतीला पाणी मिळत नव्हते, कोरडवाहू जमिनीमुळे आमची हालअपेष्टा झाली. आता शेतीला पाणी मिळाले आहे, उत्तम प्रकारे पीक येऊ लागले आहे आणि चांगल्या कसदार जमिनी रस्ते प्रकल्पाच्या नावाखाली काढून घेतल्या जात आहेत हे आम्ही कदापि सहन करणार नाही. कुठल्याही परिस्थितीत पान २ वर

## आजी-माजी कृषीमंत्री अडचणीत

### दोघांच्याही राजीनाम्यासाठी विरोधक आक्रमक

पुणे । प्रतिनिधी



बनावट कागदपत्रे देऊन मुख्यमंत्री कोट्यातून सदनिका लाटल्याच्या प्रकरणात नाशिक न्यायालयाने राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे व त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावल्यामुळे कोकाटे यांचे मंत्रीपद यांची आमदारकी धोक्यात आली आहे. यावरून आता भ्रष्ट मंत्री माणिकराव कोकाटे व कृषी घोटाळ्यात आरोप झाल्याने धनंजय मुंडे यांची तत्काळ मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी मागणी विरोधकांनी केली आहे.

मुख्यमंत्री कोट्यातून अल्प उत्पन्न गटातील लोकांना कमी दरात सदनिका दिली जाते. १९९५ साली माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू विजय कोकाटे यांनी बनावट कागदपत्रे सादर करून नाशिकमधील एका इमारतीत चार सदनिका घेतल्याची तक्रार दाखल झाली होती. याची चौकशी करून न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. या प्रकरणावर निकाल देताना नाशिक न्यायालयाने राज्याचे कृषिमंत्री माणिक कोकाटे व त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना दोषी ठरवत दोन वर्षांचा तुरुंगवास आणि प्रत्येकी ५० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. दोन वर्षांची शिक्षा झाल्याने कोकाटे यांचे मंत्रिपद तर धोक्यात आलेच आहे, पण आमदारकीही जाण्याची शक्यता पान २ वर

# कृषी खात्यात ३०० कोटींचा घोटाळा !

## मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आ.सुरेश धसांचे गंभीर आरोप

आष्टी । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस सोयाबीन आणि इतर गळीत धान्य उत्पादकता वाढ आणि मूल्य साखळी विकास योजनेची घोषणा दि.११मार्च २०२२ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री आजचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केली या योजनेमध्ये तात्कालीन कृषी मंत्री धनंजय मुंडे आणि त्यांचे सहकारी यांनी कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्याने या सर्व प्रकरणाचा विशेष तपास यंत्रणेद्वारा तपास करण्याची मागणी आपण करणार आहोत असा घणाघाती आरोप करत आ.सुरेश धस यांनी तत्कालीन कृषी मंत्री आणि सध्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचे वर निशाणा साधला आहे.**

आपल्या आष्टी येथील विशेष पत्रकार परिषदेमध्ये प्रसार माध्यम प्रतिनिधींशी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले,या योजनेसाठी सन २०२२/२३,२०२३ /२४ आणि २०२४/२५ या तीन वर्षासाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली त्यानुसार कृषी विभागाने विद्यापीठातील तज्ञांच्या सहकार्याने मार्गदर्शक सूचना तयार केल्या या योजनेमध्ये सोयाबीन व इतर गळीत धान्य आधारित पद्धतीला चालना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पादकतेमध्ये वाढ करणे, उत्पादकता वाढवणे, सोयाबीन व इतर गळीत धान्य पिकांच्या मूल्य साखळीला चालना देणे, काढणीनंतर पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून साठवणूक सुविधा उपलब्ध करून देणे नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पान २ वर



### नैतिकता ओळखून राजीनामा द्यावा

संतोष देशमुख हत्या प्रकरणात झालेल्या कृषी घोटाळ्याच्या आरोपांमध्ये धनंजय मुंडे यांनी आपली नैतिकता ओळखून मंत्री पदाचा राजीनामा द्यावा अजित पवार यांच्यावर ७० हजार कोटीचे आरोप झाल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला होता तसा राजीनामा धनंजय मुंडे यांनी द्यावा तर इतर प्रकरणात व कृषी घोटाळ्याच्या प्रकरणात सखोल तपास होईपर्यंत यांनी राजीनामा द्यायला हवाय असे देखील आमदार सुरेश धस यांनी सांगितले.

### असा भ्रष्टाचार झाल्याचा केला दावा

धस म्हणाले, ''नॅनो युरियामध्ये २१ कोटी २६ लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाला. डीएपीमध्ये ५६ कोटी ७६ लाख रुपये, बॅटरीमध्ये ४५ कोटी ४३ लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाला. तर कापूस साठवणूक बॅगमध्ये एक बॅग ५७७ रुपयांची असताना १२५० रुपयांनी खरेदी केली. १८० कोटी ८३ लाख रुपये धनंजय मुंडे आणि त्यांच्या चमूने बाहेर काढले.'' असा आरोपही धस यांनी केला.

### वाल्मिक कराड हे राज्याचे बाप होते का?

सुरेश धस म्हणाले, वाल्मिक कराड यांनी निविदा ठरवल्या, वाल्मिक कराड हे राज्याचे बाप होते का? महाराष्ट्रात ठराविक एजंटची नेमणूक केली होती. या सर्वांचे काढा, १०० कोटींपेक्षा अधिकचा भ्रष्टाचार यात आहे. वाल्मिक कराड जिल्ह्याचे बाप वाटत होते, मात्र निविदा काढण्यात देखील तो बाप होता असा टोला सुरेश धस यांनी लगावला आहे.

### एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी

यावेळी धस यांनी यामध्ये सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांचे नाव उघड केली. तसेच भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन करण्याची मागणी केली. धस म्हणाले, ''या घोटाळ्यात रफीक नाईकवाडे मुख्य अ‍ॅक्टर आहेत. भांमरे आजही त्यांच्यासोबत आहेत. या चमूने फक्त कागदपत्र रंगवली आहेत. लोकायुक्त कार्यालयाला देखील खोटी माहिती देण्यात आली. त्यामुळे मुंडे यांच्या काळातील भ्रष्टाचाराची एसआयटी स्थापन करून चौकशी करा.'' अशी मागणी धस यांनी केली आहे.

### मणिपूरच्या राज्यपालांनी दिला बंडखोरांना अल्टिमेटम !

नवी दिल्ली: मणिपूरचे राज्यपाल अजय भल्ला यांनी गुरूवारी बंडखोरांना बेकायदेशीर व लूटलेली हत्यारे परत करण्याचे आदेश दिले आहेत. यासाठी त्यांना सात दिवसांची मुदत दिली आहे. गेली दोन वर्षे मणिपूरमध्ये सुरु असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर राज्यपालांनी पहिल्यांदाच असे आदेश दिले आहेत. मैतेयी व कुकी समाजामध्ये गेली दोन वर्षे संघर्ष सुरु आहे. पान २ वर

## साखर होणार कडू! उत्पादनात घट

पुणे । प्रतिनिधी

**मागील एका महिन्यात भारतातील साखरेच्या किंमतीत ६.५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. खराब हवामान आणि साखर निर्यातीमुळे साखरेचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे साखरेच्या किंमतीत आणखी वाढण्याची शक्यता आहे.**

साखर हा सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग असल्याने येणाऱ्या काही महिन्यात साखर महागणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आल्याचे वृत्त इंडिया टुडेने दिले आहे. व्यापार आकडेवारीनुसार, एस - ३० ग्रेडच्या साखरेसाठी महाराष्ट्रातील साखर कारखान्याच्या किंमती १७ फेब्रुवारीपर्यंत प्रतिक्विंटल प्रति ३ हजार ७९० रुपये आहेत. ही किंमत एका महिन्यापूर्वी पान २ वर

## लोकपालच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**लोकपाल आणि लोकायुक्त कायदा, २०१३ अंतर्गत उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांविरुद्ध तक्रारी दाखल करता येऊ शकतात, असा लोकपालने २७ जानेवारी रोजी आदेश दिला होता. लोकपालच्या या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी स्थगिती दिली. हा न्यायपालिकेच्या स्वातंत्र्याबाबत हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असल्याचे न्यायालयाने म्हटले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ मार्च रोजी होणार आहे. या आदेशाबद्दल बोलताना खंडपीठाने म्हटले की, ही खूप त्रासदायक गोष्ट आहे.** पान २ वर

## रेखा गुप्ता बनल्या दिल्लीच्या नवव्या मुख्यमंत्री

नवी दिल्ली । वृत्तसंस्था



शालीमार बाग येथील भाजप आमदार रेखा गुप्ता दिल्लीच्या नवव्या मुख्यमंत्री बनल्या. रामलीला मैदानावर त्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री देखील या कार्यक्रमात उपस्थित होते.

रेखा गुप्ता यांच्यासोबत ६ मंत्र्यांनीसुध्दा यावेळी शपथ घेतली. यामध्ये प्रवेश वर्मा, आशिष सूद, मनजिंदर सिंग सिरसा, रवींद्र इंद्राज सिंग, कपिल मिश्रा आणि पंकज कुमार सिंग यांचा समावेश आहे. शपथ घेण्यापूर्वी रेखा गुप्ता यांनी पान २ वर

## 'मला २ मिनिटेही बोलता येत नाही...' मंत्री धनंजय मुंडे यांची पोस्ट चर्चेत

बीड । प्रतिनिधी



**बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांड आणि मुंडे यांच्या पहिल्या पत्नी करूणा मुंडे या दोन प्रकरणात अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे सध्या चर्चेत आहेत. दरम्यान त्यांच्यावर रूग्णालयात डोळ्यांची शस्त्रक्रिया करण्यात आली असून ते रुग्णालयात असल्याचेही वृत्त आहे. त्यांच्या आरोग्याविषयी मुंडे यांनी आता स्वत: च माहिती दिली आहे.**

मंत्री मुंडे यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, ''१५ दिवसापूर्वी प्रसिद्ध डोळे विकारतज्ज्ञ डॉ. लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या डोळ्याची शस्त्रक्रिया पार पडली. त्यानंतर १० दिवस त्यांनी डोळ्याची पान २ वर

## जीडीपी ६.३ टक्के राहणार एसबीआयचा अंदाज

मुंबई । प्रतिनिधी

नॅशनल स्टॅटिस्टिकल ऑफिस अर्थात एलएसओने जाहीर केलेल्या क्यू १ आणि क्यू २ च्या वाढीच्या आकड्यांमध्ये कोणतीही मोठी सुधारणा होत नाही, या गृहीतावर एसबीआय रिसर्चने एका अहवालात २०२५ मध्ये भारताची जीडीपी वाढ ६.३% राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. एसबीआयचा अंदाज एनएसओच्या चालू आर्थिक वर्षासाठी ६.४% वाढीच्या अंदाजापेक्षा १० बेस पॉइंट्स कमी आहे. क्यू १ आणि क्यू २ मध्ये, जीडीपी अनुक्रमे ६.७% आणि ५.४% ने वाढला होता. क्यू ३ साठी, एसबीआय ६.२-६३% वाढीचा अंदाज लावतो, त्याच्या 'नॉकास्टिंग मॉडेल'वर आधारित, जे ३६ उच्च-फ्रिक्वेंसी निर्देशकांवरील डेटाचे विश्लेषण करते. पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२० फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ९८.०० क्विंटल** | | |
| २,६३६ | ३,३६१ | ३,१६५ |
| **ज्वारी/हायब्रिड :१५८.०० क्विंटल** | | |
| १,९०० | २,९०० | २,३७६ |
| **मका/लोकल:५.०० क्विंटल** | | |
| २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| **तूर : ९७.०० क्विंटल** | | |
| ६,००० | ७,४३६ | ७,२१२ |
| **उडीद : ८.५० क्विंटल** | | |
| ५,३०० | ५,५०० | ५,४३३ |
| **बाजरी: २.५० क्विंटल** | | |
| ३,२०१ | ३,२०१ | ३,२०१ |
| **मुग : ०.५० क्विंटल** | | |
| ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| **सोयाबीन: १५७.५० क्विंटल** | | |
| ४,००० | ४,०१७ | ४,००५ |
| **हरभरा: १२९.५० क्विंटल** | | |
| ४,९०० | ८,००० | ५,५७६ |

# लाडक्या बहिणींसाठी गुडन्यूज ; आजपासून खात्यावर फेब्रुवाराचा हप्ता

## अर्थ खात्यातून ३४९० कोटी रुपये वर्ग

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील लाडक्या बहिणींसाठी मोठी बातमी समोर आली आहे. लाडकी बहीण योजनेतील फेब्रुवारीचा हप्ता वेळेच्या आधीच मिळणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फेब्रुवारीचा हप्ता शुक्रवार पासून द्यायला सुरुवात होणार आहे. यासाठी वित्त विभागाकडून ३४९० कोटी रुपये वर्ग करण्यात आले आहेत. दरम्यान, यावेळी जानेवारीच्या तुलनेमध्ये फेब्रुवारीत लाभार्थींची संख्या घटण्याची शक्यता आहे.**



लाडक्या बहिणींचा फेब्रुवारीचा हप्ता कधी जमा होणार? असा सवाल उपस्थित केला जात होता. पण आता शुक्रवार पासूनच लाडकी बहिण योजनेचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात होणार आहे. डिसेंबर अखेर २ कोटी ४६ लाख महिला लाभार्थी होत्या. त्यातील ५ लाख महिला अपात्र झाल्यानंतर जानेवारीअखेर २ कोटी ४१ लाख लाभार्थी महिला होत्या. मात्र, अद्याप फेब्रुवारी अखेरची आकडेवारी आलेली नाही. मात्र, त्यातही अनेक महिला अपात्र ठरण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून कमी केलेल्या महिलांची संख्या ९ लाख होणार आहे. यापूर्वी ५ लाख महिलांची नावे कमी करण्यात आली होती. आता नव्याने ४ लाख महिलांची संख्या कमी होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या ९४५ कोटी रुपयांची बचत होणार असल्याची माहिती आहे. नमो शेतकरी योजनेचा लाभ आणि लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या ५ लाख महिला आहेत. या महिलांना पान २ वर

### २१-६५ वयोगटातील महिलांना मिळतात १५०० रुपये

राज्य सरकारकडून विधानसभा निवडणुकीच्या आधी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्त्वाकांक्षी योजना राबवण्यात आली होती. या योजनेच्या अंतर्गत महिलांना दर महिन्याला दीड हजाराचा लाभ दिला जातो. २१-६५ वयोगटातील ज्या महिलांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न २.५ लाखांपेक्षा कमी असावे. त्यांच्या खात्यात दरमहा १५०० रुपये जमा होतात.

cmyk

## अग्रलेख

# देवा भाऊंची फाजील लाडाला टाच !

देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांना शिस्त लावण्याचा आणि त्यासाठी पाऊले टाकायला प्रारंभ केला आहे. खरे तर या गोष्टीचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे पण त्यामुळे काही आमदार, मंत्री व पक्ष नाराज दिसत आहेत. या मंडळींच्या राजी–नाराजीपेक्षा महाराष्ट्र हित, शिस्त व नियम आणि संकेतांचे पालन महत्त्वपूर्ण आहे आणि ते केलेच पाहिजे आणि फडणवीस यांनी ते मनावर घेतलेले दिसते यात त्यांना कितपत यश मिळते हे बघायचे पण प्रारंभ झाला आहे. मांजराच्या गळ्यात घंटी कोण बांधणार असे म्हणत केवळ दिवस ढकलण्यात आणि राज्य अडचणीत आणण्यात काहीही मतलब नसतो. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री आणि गृहमंत्री म्हणून अनेक आमदारांना, मंत्र्यांना दिलेले पोलीस संरक्षण कमी केले आहे. जोडीला मंत्रीमंडळासमोर येणारे विषय याबद्दलही गोपनीयता व शिस्त याची आठवण करून देत कानपिचक्या दिल्या आहेत. यातून त्यांचे सहकारी व मंत्रीमंडळातील सहकारी योग्य बोध घेतीलच पण फडणवीस यांच्यावर एकनाथ शिंदे गटाचे आमदार नाराज आहेत अशी मंत्रालयात कुजबुज आहे.

अलीकडेच वेगवेगळ्या व्यक्तींना पोलिस संरक्षण हा विषय उच्च न्यायालयात गेला होता. तेव्हा राज्य सरकारने पोलीस संरक्षण मिळवणे, हा नागरिकांचा अधिकार नाही. प्रत्येक व्यक्तीच्या जीवाला किती धोका आहे, याची पडताळणी करूनच संबंधितांना पोलीस संरक्षण देण्यात येईल. त्याचबरोबर कोणालाही अनिश्चित काळासाठी पोलीस संरक्षण देण्यात येणार नाही. संबंधित समिती दर सहा महिन्यांनी आढावा घेऊनच पोलीस संरक्षण कायम करायचे की नाही, याबाबत निर्णय घेईल, असे म्हटले होते ज्यांच्या जीवाला खरोखरच धोका आहे, अशा खासगी लोकांनाच पोलीस संरक्षण मिळेल. मात्र, त्यासाठी त्यांना शुल्क भरावे लागेल, अशी तरतूद राज्य सरकारच्या नव्या धोरणात करण्यात आली आहे. पोलीस संरक्षण मिळवणे आपला अधिकार आहे, असे नागरिकांनी गृहित धरू नये. पैसे भरल्यावर सरकार आपल्याला ही सेवा पुरवेल असा समजही नागरिकांनी करून घेऊ नये. सुधारित धोरणानुसार, ज्याच्या जीवाला खरोखरच धोका असेल, अशा खासगी लोकांना त्यात सेलिब्रिटींचाही समावेश आहे, त्यांनाच पोलीस संरक्षण मिळेल. परंतु, त्यासाठी शुल्क भरावे लागेल, अशी माहिती महाअधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी मुख्य न्यायमूर्ती मंजुळा चेल्लूर व न्यायमूर्ती एम. एस. सोनक यांच्या खंडपीठाला दिली आहे. ज्या खासगी लोकांना व सेलिब्रिटींचा पोलीस संरक्षण मिळवण्याबाबतचा अर्ज मंजूर होईल त्यांना आगाऊ शुल्क भरावे लागेल किंवा बँक गॅरंटी द्यावी लागेल, असेही कुंभकोणी यांनी स्पष्ट केले आहे. पोलीस संरक्षण देताना अनेक बाबींचा विचार करण्यात येणार आहे. त्यात संरक्षण मागणाऱ्या व्यक्तीच्या उत्पन्नाचा विचार केला जाईल. त्या व्यक्तीच्या उत्पन्नाच्या १५ टक्क्यांहून अधिक शुल्क पोलीस संरक्षण पुरविण्यासाठी आकारले जाणार नाही. तसेच ज्यांचे उत्पन्न ५० हजार रुपयांहून कमी आहे, मात्र त्यांच्या जीवाला खरोखरच धोका आहे, अशा व्यक्तीकडून संरक्षणाचे शुल्क आकारले जाणार नाही. तसेच आमदार, खासदार, सरकारी अधिकारी कर्तव्यावर असताना त्यांना देण्यात येणाऱ्या पोलीस संरक्षणासाठीही शुल्क आकारले जाणार नाही, असे कुंभकोणी यांनी न्यायालयाला सांगितले होते.

अलीकडे काही वर्षे पोलिस संरक्षण आणि तेही मोफत हा स्टेटस सिम्बॉल बनत चालला होता. मध्यंतरी मुंबईत दोन नेते समोरासमोर आले आणि एकमेकांच्या अंगावर धावले व त्यांच्यात फ्री स्टाईल फायटिंग सुरु झाली. दोघांनाही शस्त्रधारी पोलीस संरक्षण होते अशावेळी पोलीसांना काय करावे यांच्या पोलीसांनी त्यांच्यावर व त्यांच्या पोलीसांनी यांच्यावर गोळ्या झाडल्या असत्या तर किती अनर्थ घडला असता, सुदैवाने असे झाले नाही पण असा पेच निर्माण झाला होता. गंमतीचा भाग सोडला तर पोलीस संरक्षणाचा प्रचंड ताफा गरजेचा आहे का? हा चिंतनाचा विषय आहे. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांपूर्वी पन्नास आमदारासह उद्धव ठाकरे यांची साथ सोडली तेव्हा त्यांना व या आमदारांना मोठे पोलीस संरक्षण देण्यात आले होते. यातील एका मंत्र्याला तर ४५ पोलीसांचा अहोरात्र बंदोबस्त होता. पण आता फडणवीस यांनी लक्ष घातले आहे. शासनाचा पै नी पै योग्य कामावर खर्च होईल आणि प्रत्येक कर्मचाऱ्याकडून उत्तम काम होईल असे पाहणे त्यांचे काम आहे. म्हणूनच ते सर्व गोष्टींचा फेर आढावा घेत आहेत व पोलीसांचा अनावश्यक बंदोबस्त हलवायला त्यांनी सुरुवात केली आहे. त्यामुळे काही आमदार मंत्री नाराज आहेत. ही नाराजी व्यक्त करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फडणवीस यांनी बोलावलेल्या बैठकांना दांडी मारली व ते गावाकडे शेतीत चकरा मारताना दिसू लागले होते. काही मंत्रालयाचे सचिव फडणवीस यांनी बदलले शिवाय स्वीय सहाय्यक वगैरे नावाखाली मंत्रालयात दलाली करणाऱ्या मंडळींना चाप लावला. शरद पवार, उद्धव ठाकरे यांची झेड सुरक्षा कायम ठेवताना ज्यांना संरक्षणाची गरज नाही त्यांची सुरक्षा कमी केली. एकप्रकारे फडणवीस आपला कारभार चोख, चांगला आणि महाराष्ट्र हिताचा होण्यासाठी पावले उचलताना दिसत आहेत. खरे तर त्याचे स्वागत केले पाहिजे. मंत्रीपदाची शपथ घेताना गोपनीयतेची शपथ दिली जाते. या शपथेचे स्मरण फडणवीस यांना आपल्या सहकाऱ्यांना द्यावे लागणे भूषणावह नाही. निवडून येणे आणि केवळ सत्ताकारण साधणं असा जो अजेंडा आज सर्व पातळीवर दिसतो आहे तो लोकहिताचा नाही. ओघानेच सर्व पातळीवर याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. अनावश्यक बंदोबस्त असो वा अपात्र व्यक्तींना रेवड्या वाटणे असो थांबवले पाहिजे. प्रशासनासह राज्यकारभारात शिस्त आणली पाहिजे आणि लोकहिताचा, काटकसरीचा, कायद्याचा, नियमांचा कारभार केला पाहिजे. त्यासाठी सर्वांनी मोठा विचार करून राजी–नाराजी दूर ठेवून सार्वहित पाहिले पाहिजे.

# बोलीभाषांनी समृद्ध झालेली मायमराठी

मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती एक संस्कृती आहे.तिच्या मातीत असंख्य उपभाषांचे,बोलींचे रोप बहरलेले आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात बोलीभाषांचे वैविध्य आढळते. जशी गंगा अनेक उपनद्यांना सामावून घेत समुद्राला जाऊन मिळते, तशीच मराठी भाषा विविध बोलीभाषांना आपल्या प्रवाहात सामावून घेत समृद्ध झाली आहे.या बोली भाषेतील विविधतेमुळे मराठी भाषेची ताकद वाढली असून तिचे सौंदर्य अधिक खुलले आहे.

१८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

**बोलीभाषांचे वैविध्य आणि त्यांचे योगदान**

महाराष्ट्रात अनेक बोलीभाषा प्रचलित आहेत. वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, कोल्हापुरी, मराठवाडी, झाडीबोली, खानदेशी, नागपुरी याशिवाय गोंडी, बंजारा, कोलामी या बोलीभाषांनी मराठी भाषेला बळ दिले आहे. म्हणतात, ‘‘दर बारा कोसांवर भाषा बदलते,‘‘ हे महाराष्ट्राच्या भाषिक वैशिष्ट्यांवर अगदी तंतोतंत लागू होते. या बोलीभाषांमधील साहित्य, लोकसंस्कृती, गाणी, नाटकं, प्रवचनं यांनी मराठीला अधिक व्यापक आणि जिवंत बनवले आहे. या बोलीभाषा मधील काही शब्दांना अर्थ आहे. हजारो उखाणे या बोली भाषांमध्ये आहे. शेकडो वाक्प्रचार या भाषेत आढळतात, विविध शब्दांसाठी एक शब्द म्हणून आशयघनता असणारे अनेक शब्द बोली भाषेत आहे. प्रेम, राग, व्देष, आनंद व्यक्त करणारे वैशिष्ट्यपूर्ण शब्द या बोलीभाषांचे महत्व सांगते.

**वऱ्हाडी बोलीभाषेचे वैशिष्ट्य**

वऱ्हाडी ही मराठीची अत्यंत महत्त्वाची आणि लोकप्रिय बोली आहे. विदर्भात बोलली जाणारी ही बोली आपल्या सहज संवादशैलीमुळे प्रसिद्ध आहे. वऱ्हाडी भाषेचा विनोदी बाज हा तिचा खास गुणधर्म आहे. वऱ्हाडी बोलीत बोलताना एक वेगळीच गंमत असते. शब्दांच्या उच्चारांतील लयबद्धता आणि लहेजा मराठीला एक वेगळेच सौंदर्य प्रदान करतो.

**वऱ्हाडी भाषेचे महत्त्व**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देताना वऱ्हाडी भाषेतील लिखाण अलिकडच्या काळात विशेष अधोरेखित झाले आहे. लीळाचरित्र या महानुभव पंथाच्या ग्रंथात वऱ्हाडीचा प्रभाव आढळतो. आद्य मराठी कवी मुकुंदराज यांच्या लेखनातही वऱ्हाडीचा वापर दिसतो. संत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता ग्रंथात वऱ्हाडीचा प्रभावी वापर केला आहे. कर्मयोगी गाडगेबाबांचे प्रवचनदेखील अस्सल वऱ्हाडी भाषेत असायचे. पुरुषोत्तम बोरकर यांची मेड इन इंडिया, उद्धव शेळके यांची धग कादंबरी त्यातील वऱ्हाडी भाषा यांनी अनेक पिढ्यांना वेड लावले आहे. अनेक अशा अशा कादंबऱ्या, कथा मान्यवर लेखकांनी मराठी वाचकांना दिल्या आहेत.

**वऱ्हाडीतील साहित्यिक योगदान**

वऱ्हाडी भाषेत विपुल प्रमाणात साहित्यनिर्मिती झाली आहे. कथा, कादंबऱ्या, कविता, आत्मचरित्र, नाटके, सिनेमा अशा विविध माध्यमांद्वारे ही भाषा आपल्या भाषिक परंपरेत एक ठसा उमटवत आहे. अनेक लेखक आणि साहित्यिकांनी वऱ्हाडी भाषेत उत्कृष्ट लेखन केले आहे. वेगवेगळ्या टीव्ही सिरीयल,कॉमेडी शो आणि चित्रपटात या बोली भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. हिंदी भाषेनंतर हास्य कवी संमेलनाची संस्कृती वऱ्हाडी भाषेने सर्वाधिक जोपासली आहे. माध्यमांमुळे या बोलीभाषा आता आपल्या सीमा भेदून सार्वत्रिक होत आहे.

प्रा. देविदास सोटे, पुरुषोत्तम बोरकर, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, बाजीराव पाटील, गो. नी. दांडेकर, महेश दारव्हेकर, पांडुरंग गोरे, विठ्ठल वाघ, डॉ. मिर्झा रफी अहमद बेग,शंकर बडे, मधुकर केचे, ज्ञानेश वाकुडकर,शाम पेठकर, नाना ढाकूलकर, मनोहर कवीश्वर, मधुकर वाकोडे, गौतम गुडदे, डॉ. प्रतिमा इंगोले, शरदचंद्र सिन्हा, जगन वंजारी, राजा धर्माधिकारी, बापुराव झटाले, ॲड. अनंत खेळकर, किशोर बळी, रमेश ठाकरे, बापुराव मुसळे, रावसाहेब काळे,सदानंद देशमुख, नरेंद्र लाजेवार, नरेंद्र इंगळे,आदी मान्यवरांसह शेकडो लेखकांनी वऱ्हाडी भाषेतील साहित्य समृद्ध केले आहे. वऱ्हाडी भाषेतील नाटक आणि गझलसुद्धा विशेष प्रसिद्ध आहेत. कविवर्य सुरेश भट यांनी मराठीत गझल लेखन केले, पण खासगी संभाषणात ते अस्सल वऱ्हाडीच वापरत. वऱ्हाडी भाषेतील सहज संवाद साधण्याची शैली, विनोदी प्रकृती, आणि लयदार उच्चार हा एक वेगळाच अनुभव देतात. विदर्भाच्या ११ जिल्ह्यांमध्ये, मराठवाड्याच्या सीमावरती भागात, तसेच मध्य प्रदेशातील तेलंगाना व आंध्र प्रदेशातील अनेक भागांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने वऱ्हाडी भाषा बोलली जाते. अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये वेगळ्या पद्धतीने तर अकोला, वाशिम, बुलढाणा या जिल्ह्यामध्ये त्यामध्ये थोडा बदल होऊन भाषा बोलली जाते. नागपूर शहरातील बोलली जाणारी भाषा ही देखील एक वेगळी वऱ्हाडी शैली आहे. नागपूर मेट्रोने तर खास नागपुरी शब्दांच्या जाहिराती केल्या आहेत. विशेष म्हणजे त्या त्या भागातील नागरिक एकमेकांना भेटल्यानंतर या शब्दांचा भरपूर वापर करतात. भाषिक जवळीकता साधण्यासाठी हे शब्द ओळखीचे काम करते. पुढे हीच भाषा भंडारा, गोंदिया, गडचिरोली या भागामध्ये वेगळा हेल घेते. तिचे उच्चार वेगळ्या पद्धतीने केले जाते. मात्र हजारोंनी या भाषेचे संवर्धन केले आहे. मराठी भाषेच्या समृद्धीचा विचार करताना मोठ्या संख्येने बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषा, त्यांचे संवर्धन आणि त्याचा अभ्यास करण्याचे व्यासपीठ अशी मोठी संमेलन असतात. दिल्लीच्या व्यासपीठावर अभिजात भाषेचा गुणगौरव होताना बोलीभाषेच्या सुप्त प्रवाहावरही चर्चा करावी लागणार आहे. बोलीचे वैभव,भाषेची संपन्नता वाढवणारे आहे.

**मराठीची अस्मिता आणि बोलीभाषांचे स्थान**

पु. ल. देशपांडे यांना वऱ्हाडी भाषेच्या विनोदी बाजाचे फार आकर्षण होते. सुरेश भट लतादीदी ,आशा भोसले आणि मंगेशकर घराण्यातील व्यक्तीशी वऱ्हाडी भाषेतून संवाद साधायचे. त्यांच्या वऱ्हाडी संवादाचे मैफिलीमध्ये खास आकर्षण असायचे. खरे तर भाषा केवळ संवादाचे साधन नसून ती तिच्या संस्कृतीचा, अस्मितेचा अभिव्यक्त होण्याचा मार्ग असते. उर्दूची अदब, गुजरातीची गोडी, आणि वऱ्हाडीची मिश्किलता, विनोदी शैली हे वैशीष्टय आहे. म्हणूनच बोलीभाषांचे अस्तित्व टिकवणे आणि त्यांना जपणे हे मराठी भाषेच्या समृद्धीसाठी आवश्यक आहे. महाराष्ट्रात बोलीभाषांनी जो भाषिक गोतावळा तयार केला आहे, त्याने मराठीला अधिक समृद्ध केले आहे. मराठीने आपल्या अंगाखांद्यावर या उपभाषांना वाढवले, संगोपन केले आणि त्यांना भाषिक अस्मिता बहाल केली. आजच्या काळातही बोलीभाषांचे संवर्धन हे मराठीच्या भविष्यासाठी महत्त्वाचे आहे. कारण मातृभाषा ही आपल्या संस्कृतीची ओळख असते. आई जी भाषा बोलते तीच मुलाची भाषा होते आणि तीच त्याच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनते. मराठी भाषा ही केवळ एक संवादमाध्यम नसून एक संस्कृती आहे. बोलीभाषा ही तिच्या समृद्धीचा गाभा आहेत. वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, कोल्हापुरी यासारख्या अनेक उपभाषांनी मराठीच्या प्रवाहाला अधिक खोल आणि विस्तारलेले स्वरूप दिले आहे. आजही मराठी भाषेच्या जडणघडणीत या बोलीभाषांचा मोलाचा वाटा आहे. बोलीभाषांचे संवर्धन आणि त्यांचे लेखन–साहित्यिक योगदान पुढे नेणे, हे मराठी भाषेच्या उज्वल भविष्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे मराठी भाषा ही केवळ बोलीभाषांच्या आधाराने अधिकाधिक समृद्ध होत राहील. नवी दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये मायमराठीच्या या उपभाषांच्या संवर्धनासंदर्भातही वैचारिक मंथन अपेक्षित आहे.मराठी भाषा ही समुद्र आहेत तर तिच्यात मिसळणाऱ्या बोलीभाषा या विविध नद्यांप्रमाणे आपले भाषिक सौंदर्य तिच्यामध्ये कायम मिसळत राहते. हा ओघ असाच कायम असणे खूप गरजेचे आहे. शब्दांचे वैशिष्ट्य, शब्दांचा गोडवा, शब्दांचे अर्थ, त्याची आशयघनता, काळाच्या गतीमध्ये लुप्त होऊ नये. थोडक्यात वऱ्हाडी शब्दांचा वापर करून सांगायचे झाल्यास असा 'बैताडपणा, छपरीपणा, इचकपणा, नंबरीपणा, उपटपणा, घरावर गोटे आणण्याचे धंदे अन्? ' जांगडबुत्ता ' मराठी भाषेवर चिंतन करताना होऊ नये ,एवढीच अपेक्षा आहे.

**प्रवीण टाके**
जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड
मो.९७०२८५८७७७

## पान १वरून...

### शक्तिपीठ महामार्ग

हा मार्ग उखडून टाकू, अधिकाऱ्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, अशी भुमिका शेतकऱ्यांनी मांडली. आता या शक्तिपीठ महामार्गावरून कोल्हापूर जिल्ह्यातून १२ मार्चला एल्गार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोल्हापूरमध्ये शक्तिपीठविरोधी परिषदेत आझाद मैदानात धडक देण्याचा निर्णय घेण्यात आला. यात कोणी मिठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न केल्यास तोही हाणून पाडा, असे आवाहन आमदार सतेज पाटील यांनी केले.

--------------

### कृषी खात्यात ३००

पोहोचवणे, दरातील चढउतारापासून संरक्षण होण्यासाठी तारण योजनेची सुविधा उपलब्ध करून देणे, अशा प्रकारच्या शेतकऱ्यांच्या फायद्याच्या या योजनेचे मुख्य उद्दिष्ट होते दिनांक २३ ऑक्टोबर २० २३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कापूस पिकाच्या उत्पादकता वाढीसाठी २३८.८९ कोटी रुपये आणि आणि सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादक वाढ मूल्य साखळी विकासासाठी २८१.९७ कोटी रुपयाची अशी एकूण ५२०. ८६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली परंतु तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी मूळ बाबी बदलून खरेदीद्वारे भ्रष्टाचार करण्यासाठी दि.२७ डिसेंबर २०२४ रोजी कृषी विभागाचा अर्थसंकल्प आणि खर्च याबाबत चर्चा केली या बैठकीत त्यांच्या सहाय्यकांनी मूळ बाबींना बगल देऊन ज्ञानोरीया नॅनो डीएपी, डीएसएमएस इत्यादी खरेदी करायची बाबीवर चर्चा घडवून आणली ज्या बाबी सन २०२२ /२३ मध्ये या बाबींचा समावेश नव्हता कृषी मंत्री धनंजय मुंडे, वैभव पवार, खाजगी सचिव प्रशांत भामरे, कृषी आयुक्तालयातील संचालक विस्तार प्रशिक्षण दिलीप झेंडे, श्री संतोष कराड उपसचिव, यांच्या भ्रष्टाचार करण्याच्या कट कारस्थानातून मूळ बाबींमध्ये बदल करून डीबीटी योजनेतून सूट देऊन डिजिटल सॉईल मॉइश्चर सेंसर,नॅनो युरिया, नॅनो डीएपी व कापुस साठवणूक बॅग, गोगल गाईचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कीटकनाशक, मेटाल्डीहाईड, बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप खरेदी करण्या संदर्भात दि.६ एप्रिल २०२४ रोजी या बाबी बदलासाठी कृषी मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलण्यात आली या बैठकीमध्ये नियमबाह्य पद्धतीने शेतकऱ्यांच्या किंवा क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची कसलीही मागणी असताना वर उल्लेख केल्या बाबी खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि तसा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला दि.१२ मार्च २०२३ रोजी प्रस्ताव सादर केला आणि शासनाने दिनांक १२ मार्च २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला. त्यामध्ये कापूस विकास योजनेत १७२.२३ कोटी रू. आणि सोयाबीन व इतर तेलबिया विकास अंतर्गत १७०.६ कोटी रु.मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, महाबीज, कृषी विद्यापीठे यांच्या मार्फत उत्पादित आणि विस्तार हस्तांतरण योजनेतून वगळण्याचे अनुषंगाने कृषी आणि विभाग मुंबई शासन निर्णय दि.१२/ ९ /२०१७ नुसार शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत त्यानुसार वर उल्लेख केला बदल केलेल्या बाबी खरेदी करता येत नाहीत त्या शासन निर्णयाच्या अटी शर्ती मध्ये बसत नाहीत तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण दि.१४ /२/२०२३, २०२४ या आर्थिक वर्षात दि १५ फेब्रुवारी २०२४ नंतर कोणतेही खरेदीच्या प्रस्तावांना मंजूर देऊ नये असे नमूद केले आहे असा स्पष्ट उल्लेख असतानाही उपसचिव श्री संतोष कराड यांनी शासनाचे पत्र दि.१६ मार्च २०२४ नुसार नॅनो युरिया, नॅनो डीएपी, कीटकनाशक, कापूस साठवणूक बॅग, बॅटरी संचलित फवारणी पंप, या निविष्ठा घटकांचा पुरवठा व्हावा यासाठी सदरच्या निष्ठांसाठीचा निधी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ व तत्सम संस्थांना अग्रीम स्वरूपात उपलब्ध करून देण्यात यावा असे कळवले कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी निविष्ठा खरेदी प्रक्रियेत बदल करून एकूण महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळासाठी २६४.९३ कोटी रुपये आणि यंत्रमाग महामंडळाकरता ७७.२५ कोटी रुपये निधी अग्रीम मंजूर करताना कसलेही निकष पाळले नाहीत त्यामध्ये दि.२३/२०१८ रोजी महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळाला नॅनो युरिया साठी १२१ कोटी रुपये अग्रीम देण्यात आले त्यामध्ये त्यामध्ये ११२ रुपये प्रति पॅक रुपये बाजारभाव असताना महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळाने अंतिम केलेले दर २२० रुपये प्रति ५०० मिली. असे असल्यामुळे यामध्ये भ्रष्टाचाराची रक्कम २१.२६ कोटी एवढी आहे तसेच नॅनो डीएपी मध्ये ५६.७६ कोटी रुपये भ्रष्टाचाराची रक्कम आहे तसेच बॅटरी कम हातचलित स्प्रे पंप यामध्ये ४५.५३ कोटी रुपये भ्रष्टाचार आहे मेटाल्डीहाईड मध्ये १५.६८ कोटी रुपये असे एकूण १३९.२३ कोटी रू.चा भ्रष्टाचार झाला आहे तसेच दि.३०/३/२०२४ रोजी यंत्रमाग महामंडळाला दिलेली अग्रिम रक्कम ७७.२५ कोटी रू असून कापूस साठवणूक यासाठी बाजार भाव ५७७ रुपये प्रति बॅग सहा बेल्ट असलेली असा असताना यंत्रमाग ने अंतिम केलेले दर १२५० रु. प्रति बॅग ती ही एक बेल्ट असलेली त्यामुळे प्रतिबॅग ६७३ रु.ज्यादा खर्च झाला असून यामध्ये भ्रष्टाचाराचे रक्कम एकूण १८०.८३ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे नॅनो डीएपी, आणि नॅनो युरियासाठी जादा दर देऊन विकत घेतले आहेत मेटाल्डीहाईड हे कीटकनाशक सुद्धा ज्यादा दराने खरेदी केले आहे त्यामध्ये सुमारे ९३.७० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे कापूस साठवणूक बॅक करता प्रति बॅग १२५०/रू ने टेंडर मंजूर केले ही बॅग निकृष्ट दर्जाची असून या बॅग खरेदीमध्ये ४१.५९ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे या संपूर्ण भ्रष्टाचारास विरोध केल्यामुळे तत्कालीन अप्पर मुख्य सचिव अनुप कुमार,प्रधान सचिव व्ही.राधा,कृषी आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, आणि रवींद्र विनवडे यांच्या तातडीने बदली करण्यात आल्या..त्यामुळे या संपूर्ण भ्रष्टाचारामध्ये वर उल्लेख केलेले सर्व अधिकारी,महाव्यवस्थापक, उपमहाव्यवस्थापक इत्यादी अधिकाऱ्यांनी आपसात केलेले संवाद तपासण्यासाठी तसेच ठेकेदार यांचे बरोबर केलेले वार्तालापाची माहिती घेण्यासाठी सर्वांच्या भ्रमणध्वनीचे तसेच कार्यालयातील आणि वैयक्तिक भ्रमणध्वनीचे सीडीआर रिपोर्ट मागविण्यात यावेत.त्यांची नार्को टेस्ट करण्यात यावी अशी ही मागणी आमदार सुरेश धस यांनी केली असून या भ्रष्टाचारि संदर्भात कृषी आयुक्त, कृषी सचिव, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापक, यंत्रमाग महामंडळ, येथील कागदपत्रे, मागवली असून त्यांचा अभ्यास करून सीबीआय, ईडी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मा. मुख्यमंत्री,मा.राज्यपाल, केंद्रशासन, यांच्याकडे सविस्तर पुराव्यासह तक्रार दाखल करणार असल्याचेही आ.सुरेश धस यांनी सांगितले तसेच धनंजय मुंडे कृषी मंत्री असताना त्यांनी केलेल्या बदल्या आणि पदोन्नती मध्ये सुद्धा सुमारे १०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. याची माहिती मागवून संबंधित यंत्रणेकडे सादर करणार आहे असेही त्यांनी शेवटी सांगितले. या पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी कृषी विभागातील कृषी सहाय्यक ते कृषी अधिकारी, संचालक, विभागीय कृषी सहसंचालक, गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, या अधिकाऱ्यांच्या बदलीसाठी घेण्यात येणाऱ्या रेटकार्ड चे जाहीर वाचन केले.सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतीय किसान संघ या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या विभागाने तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री आणि आजचे मुख्यमंत्री यांच्याकडे दि.२५ मे २०२४रोजी तक्रार करून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या वस्तूंमध्ये लाभार्थ्यांवर अन्याय आणि लाभ,बँक खात्यावर जमा करण्यात यावा.परस्पर वस्तू खरेदीमध्ये भ्रष्टाचार होऊन त्यात लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या कमी करणे इत्यादी बाबी असल्यामुळे मा.पंतप्रधानांनी देखील डीबीटीचा आग्रह केलेला आहे तरीही महाराष्ट्रात शेतकऱ्यांना वस्तू देणे प्रकार सुरू असल्यामुळे या सर्व वस्तू बाजारात स्वस्त दरात म्हणत असताना जास्त किमतीत विकत घेतल्याने निर्धारित रक्कम निश्चित असल्याने लाभार्थी शेतकरी संख्या कमी झालेली आहे हा अन्याय दूर करावा याबाबत श्री.दिलीप ठाकरे प्रांत प्रचार प्रमुख भारतीय किसान संघ श्री.रामराव गोमासे नागपूर जिल्हा कार्यकर्ता आणि श्री.नाना आखरे भारती किसन संघ अखिल भारतीय कार्यकारीणी सदस्य यांनी पत्र देऊन तक्रार केली असता सदरील पत्र कृषी आयुक्त कार्यालयामध्ये धनंजय मुंडे यांचे सहकारी वाल्मीक कराड यांनी हे पत्र फाडून फेकून दिले. पंपहे मूळ पत्र गायब करण्यात आले आहे.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आदेश मा.पंतप्रधान मोदी देखील शिरसावंद्य मानतात परंतु वाल्मीक कराड यांची हे पत्र फाडण्यातून किती दहशत,मग्रूरी होती.हे दिसून येत असल्याचेही त्यांनी शेवटी सांगितले.

-------------

### आजी–माजी कृषीमंत्री

आहे. लोकप्रतिनिधी कायद्यातील तरतुदीनुसार दोन वर्षांपेक्षा अधिक शिक्षा झाल्यास सदस्यत्व रद्द होते. यापूर्वी मागच्या विधानसभेत बँक घोटाळा प्रकरणात काँग्रेस आमदार सुनील केदार यांना शिक्षा झाल्यानंतर त्याचे सदस्यत्व रद्द करण्यात आले होते. लोकप्रतिनिधींना दोन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीची शिक्षा झाल्यास खासदार किंवा आमदार लगेचच अपात्र ठरतात अशी तरतूद लोकप्रतिनिधी कायद्यात आहे. याच तरतुदीनुसार सुरत न्यायालयाने काँग्रेसने नेते राहुल गांधी यांना अब्रूनुकसानीचा खटल्यात शिक्षा सुनावताच त्यांची खासदारकी लोकसभा अध्यक्षांनी रद्द केली होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने सुरत न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिल्याने अपात्रतेचा निर्णय मागे घ्यावा लागला होता. त्याप्रमाणे कोकाटे यांच्या शिक्षेला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली तरच कोकाटे यांची आमदारकी वाचू शकते. पण मंत्रिपदाच्या राजीनाम्यासाठी मात्र विरोधकच नाही तर सत्ताधारी महायुतीतूनही मोठा दबाव असणार आहे. यामुळे शिक्षेला स्थगिती मिळो किंवा नाही, कोकाटे यांचे मंत्रीपद जाणार, अशी चर्चा आहे. धनंजय मुंडे यांची पाठराखण केल्यामुळे आधीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका होत असताना माणिकराव यांची ते किती पाठराखण करणार याबद्दलही शंका व्यक्त होत आहे. भारतीय जनता पक्ष युतीचे सरकार भ्रष्ट मंत्र्यांची टोळी बनली आहे. शेतकऱ्यांच्या नावावर माजी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी भ्रष्टाचार करताना सर्व मर्यादा ओलांडल्याचे उघड झाले असल्याचा आरोप करीत त्यांच्याही राजिनाम्याची मागणी करण्यात येत आहे. या दोन्ही आजी –माजी कृषी मंत्र्यांनी राजिनामा देण्याची मागणी काँग्रेससह सगळ्याच विरोधकांनी केली आहे.

-----------

### मणिपूरच्या राज्यपालांनी

अनेक ठिकाणी मानवी हक्कांचे उल्लंघन होईल अशा पद्धतीचा हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. नुकताच तेथील मुख्यमंत्र्यांनी राजिनामा दिला आहे.

-----------

### ‘मला २ मिनिटेही बोलता येत नाही...’

काळजी घेतली. मात्र आता त्यांना बेल्स पाल्सी या आजाराचे निदान झाल्याचे म्हटले आहे. बेल्स पाल्सी या आजाराचे निदान झाल्यानंतर त्यांच्यावर सध्या रिलायन्स हॉस्पिटल मधील प्रसिद्ध डॉ. अरुण शहा यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू आहेत. त्यामुळे त्यांना बैठका आणि कार्यक्रमांना हजर राहता आले नाही. या आजारामध्ये सध्या त्यांना सलग दोन मिनिट देखील व्यवस्थित बोलता येत नसल्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. याबाबत मी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कल्पना दिलेली आहे. लवकरच या आजारावर मात करून मी पुन्हा जनसेवेच्या कामात रुजू होईल, असे देखील मंत्री धनंजय मुंडे यांनी एक्सवर सांगितले आहे. दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मंत्री धनंजय मुंडे यांना लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या संदर्भातील माहिती त्यांनी एक्स पोस्ट करत दिली आहे. दमानिया यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, हा एक मज्जातंतूचा आजार आहे. हा कधी स्ट्रेसमुळे व कधी नागीणची साइड रिएक्शन म्हणून होतो. ते लवकर म्हणजे ४ आठवड्यात ठीक होतीलच. (हा माझा विषय आहे म्हणून मी म्हणत आहे). माझी लढाई त्यांच्या वृत्ती विरुद्ध आहे, त्यांच्या दहशती विरुद्ध आहे, त्यांच्या भ्रष्टाचारा विरुद्ध आहे. ती चालू राहीलच पण त्यांना तब्येतीसाठी शुभेच्छा.

----------

### रेखा गुप्ता बनल्या

गुरुवारी सकाळी माध्यमांना सांगितले की ही एक मोठी जबाबदारी आहे. माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल मी पंतप्रधान मोदी आणि पक्षाच्या हायकमांडचे आभार मानते. मी कधीच विचार केला नव्हता की मी दिल्लीची मुख्यमंत्री होईन. मी शीश महालात राहणार नाही. शीश महाल हे दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान आहे. अरविंद केजरीवाल यांनी ते बांधले होते. केजरीवाल यांनी नियमांचे उल्लंघन करून ते बांधण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केल्याचा भाजपचा आरोप आहे. भाजपनेही तो निवडणुकीचा मुद्दा बनवला होता.

--------------

### लाडक्या बहिणींसाठी गुडन्यूज ;

लाडकी बहिण योजनेतील फक्त ५०० रुपये मिळणार तर नमो शेतकरी योजनेतून १००० रुपये मिळणार आहेत. दिव्यांग विभागातून लाभ मिळणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेतून त्यांना वगळले जाणार आहे. वाहनं असलेल्या अडीच लाख महिला आहेत त्यांनाही यातून वगळण्यात आले आहे. सोबतच निकषात न बसणाऱ्या अनेक महिला आहेत त्यांनीही पैसे परत करायला सुरुवात केली आहे.

--------------

### लोकपालच्या आदेशाला सर्वोच्च

न्यायमूर्ती बी आर गवई, न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती अभय एस. ओका यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार, लोकपालचे रजिस्ट्रार आणि उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीशांविरुद्ध तक्रार दाखल करणाऱ्या व्यक्तीला नोटीस बजावली आहे. २७ जानेवारी रोजी लोकपालने निर्णय दिला होता की, उच्च न्यायालयाचा न्यायाधीश लोकपाल कायद्याच्या कलम १४(१)(एफ) च्या कक्षेत येणारी व्यक्ती म्हणून पात्र असेल. म्हणजेच त्यांच्याविरुद्ध देखील तक्रार दाखल करता येऊ शकेल. सदर आदेशानंतर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सुमोटो दखल घेतली आहे. त्यानंतर या प्रकरणावर आज सुनावणी झाली आणि लोकपालच्या आदेशाला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. केंद्र सरकारची बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की उच्च न्यायालयाचे न्यायाधीश कधीही लोकपाल आणि लोकायुक्त कायदा, २०१३ च्या कक्षेत येणार नाहीत. प्रत्येक न्यायाधीश हा उच्च न्यायालय आहे, असे मेहता म्हणाले. न्यायमूर्ती गवई आणि न्यायमूर्ती ओका म्हणाले की, देशात संविधान लागू झाल्यानंतरही उच्च न्यायालयाचे न्यायाधीश संविधानाचे रक्षक म्हणून काम करत राहिले. त्यांना वैधानिक अधिकारी मानले जाऊ शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने आज लोकपालांसमोर उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांविरुद्ध तक्रारी दाखल करणाऱ्या व्यक्तीला न्यायाधीशांचे नाव आणि तक्रारीतील मजकूर उघड करण्यापासून मनाई केली.

--------------

### साखर होणार कडू!

प्रतिक्विंटल ३ हजार ५६५ रुपये आणि दोन महिन्यांपूर्वी प्रतिक्विंटल ३ हजार ३८० रुपये होती. मागील वर्षाच्या तुलनेत साखरेच्या किंमती ६.३ टक्क्यांनी वाढल्या आहेत आणि गेल्या दोन महिन्यांत १२ टक्क्यांनी साखरेच्या किंमतीत वाढ झाली आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी २०२५



## चौसाळा येथे महादेव,गणपतीसह विठ्ठल–रुक्मिणी मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा



**चौसाळा | प्रतिनिधी**

चौसाळा येथील बेलेश्वर नगर येथील नागरिका च्य सहभागातून महादेव गणपती विठ्ठल रुक्मिणी यांची प्राणप्रतिष्ठा सोहळाच नुकताच आयोजित करण्यात आलाआहे

या मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा च्या निमित्ताने कार्यक्रमाचे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत आज दिनांक २१ फेब्रुवारी २०२५रोजी कलश रोहन कार्यक्रम हरिचंद्रभागा आश्रमाचे शेषराव महाराज कदमंच्या हस्ते आयोजित केले आहे या कलश रोहनाच्या कार्यक्रमानंतर बेलेश्वर नगरच्या नागरिकाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी या महाप्रसादाच्या कार्यक्रमाचा चौसाला परिसरातील भविक भक्तानी लाभ घ्यावा असे आव्हान बेलेश्वर नगर भागातील नागरिकांनी केले आहे.

# राजा हरिश्चंद्र शिवरात्र महोत्सवाची दिमाखात सुरुवात ; राज्यातील नामवंत कीर्तनकारांची हजेरी

**वडवणी | प्रतिनिधी**

भारत देशातील राजा हरिश्चंद्राचे एकमेव मंदिर असणारे ठिकाण बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे आहे. या तीर्थस्थळावर दरवर्षीप्रमाणे या वर्षीही राजा हरिश्चंद्र शिवरात्र महोत्सवाची सुरुवात आज गुरुवारी २० फेब्रुवारी पासून होत असून या शिवरात्र महोत्सवात राज्यातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. या सोहळ्याची पूर्ण तयारी झाली असून बीड जिल्ह्यासह राज्यातील भाविकांनी राजा हरिश्चंद्राच्या दर्शनाचा आणि महाशिवरात्र महोत्सवातील कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन या तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांनी केले आहे.

सत्यवादी, न्यायनिष्ठ राजा तसेच स्वप्नात राज्य दान देणारा दानशूर राजा म्हणून ख्याती असलेले राजा हरिश्चंद्राचे एकमेव मंदिर बीड जिल्ह्यातील वडवणी जवळील राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे आहे. या तिर्थस्थळावर संत भगवान बाबा यांनी महाशिवरात्र महोत्सवाची सुरुवात केली होती. त्यांचे उत्तराधिकारी संत भिमसिंह बाबा यांनी ही परंपरा आयुष्यभर चालवली. आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांच्या आधिपत्याखाली या तीर्थ स्थळाचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या नेतृत्वाखाली ही परंपरा चालू आहे. यावर्षी या ठिकाणी महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन केले असून जय्यत तयारी करण्यात आली आहे. राज्यातील नामवंत कीर्तनकार या महोत्सवात आपली हजेरी लावून कीर्तने करणार आहेत. आज दिनांक २० फेब्रुवारी रोजी महोत्सवाची सुरुवात झाली असून २६ रोजी काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. आज २० रोजी रात्री समाधान महाराज शर्मा केज, २१ रोजी पुरुषोत्तम





महाराज पाटील, २२ रोजी प्रकाश महाराज साठे, २३ रोजी कृष्णा महाराज शास्त्री भगवानगडकर, २४ रोजी निवृत्ती महाराज इंदुरीकर, २४ रोजी ज्ञानेश्वर महाराज जळकीकर, २५ रोजी महाशिवरात्रीच्या रात्री भगवानगडाचे महंत नामदेव महाराज शास्त्री यांची कीर्तन सेवा होणार असून दिनांक २६ रोजी सकाळी ११:०० ते १:०० या वेळेत महंत भगवान बाबा राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे. यावेळी आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन महंत भगवान बाबा राजपूत यांच्यासह परिसरातील राजा हरिश्चंद्र पिंपरी पंचक्रोशीतील गावकऱ्यांनी केली आहे.

भरत पठाडे, रवी पवार, रामानंद ढाले या महाराजांची जुगलबंदी

राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर सर्वांचं आकर्षण असतं ते मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे गायनाचार्य रवी महाराज पवार आणि गायनाचार्य रामानंद महाराज ढाले यांच्यावर. ख्यातनाम मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे यांचा मृदंग कडाडताना भाविकांना पाहायला मिळतो या मृदंगावर रवी महाराज पवार, रामानंद महाराज ढाले गुरुजी यांची जुगलबंदी पाहताना भाविकांच्या अंगावर काटा उभा राहतो. कीर्तनकारांपेक्षाही ही मंडळी भाविकांचं मन तल्लीन करून टाकतात.

### वडवणी तालुक्यातील गावकरी कार्यक्रमाचे यजमान

राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्र हे जगभरात केवळ वडवणी तालुक्यात आहे. या तीर्थक्षेत्रावरील हा कार्यक्रम धुमधडाक्यात व्हावा या उद्देशाने वडवणी तालुक्यातील सर्व गावकरी या कार्यक्रमाचं यजमानपद घेतात. तालुक्यातील हरीचंद्र पिंपरी परिसरातील पिंपरखेड, साळींबा, मामला, कान्हापुर, लक्ष्मिपुर, देवगाव, देवडी, खळवट लिमगाव, परडी, माटेगाव, चिंचाळा, खापरवाडी, दुकडेगाव, चींचोटी, कवडगाव, मोरेवाडी, बाहेगव्हाण, वडवणी, मोरवड, तीगाव, पुसरा, कुप्पा आदी अनेक गावकरी या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी झटणार आहेत.

### तरुणांची फौज

हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी राजा हरिश्चंद्र पिंपरी आणि पंचक्रोशीतील शेकडो तरुण या ठिकाणी आपली कामे सोडून वाढ करण्यासाठी, स्वच्छता करण्यासाठी, तसेच आलेल्या भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी या ठिकाणी मेहनत घेत असतात. या तरुणांच्या फौजेमुळे या ठिकाणी आलेल्या सर्व भाविकांचे संरक्षणही होत असते.

## सुशिल डक यांच्या वाढदिवसानिमीत्त मुनरवाडीत आरोग्य शिबीर संपन्न



**माजलगाव | प्रतिनिधी**

शहरातील सिताराम अर्बनचे चेअरमन तथा युवा नेते सुशिलभैय्या डक यांच्या वाढदिवसानिमीत्त मनुरवाडी येथे सामाजिक कार्यकर्ते नितीन थोरात यांच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन दि.२० फेब्रुवारी गुरुवार रोजी करण्यात आले होते.

शिबीराचे उद्धाटन उपसरपंच रमेश गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सरपंच संजय बडवणे,आयोजक नितीन थोरात, ग्रामपंचायत सदस्य विकास हारकाळ, बिभिषण थोरात, करण थोरात, अजय थोरात, माउली शेळके, कैलास थावरकर यांचेसह ग्रामस्थांची उपस्थिती होती. या मोफत आरोग्य तपासणी शिबीरात मनुरवाडी गावातील ७० रूग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. रूग्ण तपासणीसाठी डॉ. यशवंत राजेभोसले व त्यांच्या टीमने परिश्रम घेतले.

## संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना बाबासाहेब सुरवसे यांचा आधार

**दिंद्रुड | प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील ग्रामपंचायत कार्यालय चे उपसरपंच सुरवसे यांनी स्वतः पुढाकार घेऊन संजय गांधी व श्रावण बाळ योजनेतील लाभार्थ्यांची होणारी फरफट थांबवली आहे. इकेवायसी साठी तालुक्याचे हेलपाटे उपसरपंच सुरवसें मुळे वाचले. गुरुवारी तहसील कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी दिंद्रुड येथे दाखल होत गावकऱ्यांसह मंडाळातील लाभार्थी यांच्या इकेवायसी पूर्ण केल्या. ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

श्रावण बाळ व संजय गांधी निराधार योजनेचे ४०० च्या वर



### गावकऱ्यांचे ईकेवायसीसाठी तालुक्याचे हेलपाटे वाचले

लाभार्थी दिंद्रुड शहरातील व दिंद्रुड मंडाळातील आहेत.शासनाच्या नियमानुसार केवायसी करणे बंधनकारक आहे.त्यासाठी तहसील कार्यालय माजलगाव येथे सर्वांना जावे लागत होते, दिंद्रुड गावचे उपसरपंच सुरवसे यांनी स्वतः पुढाकार घेऊन तहसील कार्यालयात जाऊन तुम्ही आमच्या गावाला एक दिवस वेळ द्या व सर्वांचे कागदपत्र दिंद्रुड मध्येच घ्यावी, अपंग विधवा व निराधार, लाभार्थी असल्यामुळे तहसील कार्यालयात न बोलवता तुम्हीच दिंद्रुड येथील ग्रामपंचायतला यावे व सर्वांचे कागदपत्रे येथेच जमा करून घ्यावे अशी विनंती केली. लागलीच गुरुवारी माजलगाव पाठक आर आर,महेश इचके,एम बी आव्हाड,अभिषेक वाघमारे , दत्ता सुरवसे,एन ए खेत्री, दादासाहेब ढगे,एफ एस हंगे,पी वाय चव्हाण या तहसील कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी यांनी सर्वांची कागदपत्रे घेऊन इकेवायसी केल्यामुळे दिंद्रुडकरांना माजलगावचे हेलपाटे करावी लागणार नाहीत.उपसरपंच बाबासाहेब सुरवसे यांच्यावर निराधार व श्रावण बाळ योजनेतील लाभार्थी कौतुक करत आहेत.

## शिवनेरी ते सांगवी पाटण: अकरा वर्षांपासून समीर शेख यांच्याकडून शिवज्योत प्रज्वलित

**आष्टी | प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील उच्चशिक्षित युवक समीर शेख गेल्या अकरा वर्षांपासून शिवनेरी किल्ल्यावरून सांगवी पाटणपर्यंत पायी शिवज्योत आणत आहे. यामागील उद्दिष्ट म्हणजे समाजात एकता व सर्वधर्मसमभावाचा संदेश पसरवणे.**

समीर शेख यांनी सामाजिक कार्यात दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असून त्यांच्या सोबत अनेक युवक जाती–धर्माचे भेद बाजूला ठेवून या उपक्रमात सहभागी होतात. या उपक्रमामुळे समाजामध्ये एकात्मतेचा आणि शिवरायांच्या विचारांचा प्रचार होतो.

समीर शेख हे एम.एससी.,



बी.एड., एम.एड.पर्यंत शिक्षण घेतलेले असून, ते उच्च विचारसरणीचे असून समाजासाठी समर्पित आहेत. यंदाही त्यांनी गावातील ५०–६० मावळ्यांसह शिवनेरी ते सांगवी पाटण हा २०० किलोमीटरचा प्रवास एका दिवसात पूर्ण केला. शिवज्योत गावात आणताना संपूर्ण रथ सजवून, पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. समीर शेख म्हणाले, ''छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करताना जाती–धर्माचा भेदभाव केला नाही. त्यांनी १८ पगड जातींना सोबत घेतले. त्यांची हीच शिकवण माझ्या मनामध्ये रुजली असून गेल्या अकरा वर्षांपासून मी पायी ज्योत आणत आहे. आपण कोणत्या जाती किंवा धर्मात जन्माला आलो, हे आपल्या हातात नसते, परंतु सर्व जाती–धर्मांचा सन्मान करणे हे आपल्या हातात आहे.''समीर शेख व त्यांच्या सहकाऱ्यांचा हा उपक्रम लोकांसाठी प्रेरणादायी ठरतो आहे. अशा माध्यमातून शिवरायांचे विचार घरोघरी पोहोचत आहेत आणि समाजात एकता टिकवण्याचा संदेश दिला जात आहे.

## पाटोद्यात शिवजयंती उत्साहात

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरासह तालुक्यात शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीने आठवडाभर कीर्तने पोवाडे विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी. सकाळी शिवाजी चौकामध्ये अभिवादन कार्यक्रम व त्यानंतर सायंकाळी भव्य दिव्य मिरवणूक शहरातील मुख्य रस्त्यावरून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची तेल चित्राची सजवलेल्या रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल ताशाचा गजर छत्रपती शिवरायांच्या जय घोषने. पाटोदा.शहर दुमदुमली सातारा येथील दांडपट्टा पथक. लाठी पथक. तलवार पथक. यांनी चितारक प्रदर्शने साजरी केली. शिवराय व मावळ्यांचा पराक्रम



कवायती मधून दाखवण्यात आला. या मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात युवक भगवे झेंडे घेऊन व भगवे फेटे घालून मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते. संपूर्ण पाटोदा शहर शिवमय झाले होते. बुधवारी सकाळी पाटोदा शहरातील शिवाजी महाराज चौकामध्ये. शिवप्रेमींनी शिवरायांना अभिवादन केले. युवा नेते सागर दास.यांचीही उपस्थिती होती. उपनगराध्यक्ष रोहिदास गीते. संदीप जावळे जब्बार पठाण ना.श्रीहरी गीते. ता अध्यक्ष.डॉक्टर नरेंद्र जावळे . सभापती.ना.किशोर आढागळे. यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते. शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले.

# होळच्या मातीचा मल्ल महाराष्ट्र केसरी होईल, तीच खरी मधुकर खाडे यांना श्रद्धांजली ठरेल

» व्याकरणाचार्य ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांचे मत; होळ येथे वै.पै. मधुकर खाडे यांच्या स्मरणार्थ किर्तन

**केज | प्रतिनिधी**

मधुकर महाराज खाडे यांनी वारकरी संप्रदायात कार्याचा कळस केला आहे. कुस्ती क्षेत्रातही मोठे कार्य उभा केले. त्यांच्या शिष्यांनी महाराष्ट्र केसरी प्राप्त करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करावी, अशी अपेक्षा संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक, व्याकरणाचार्य ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांनी व्यक्त केली.

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. केज तालुक्यातील होळ येथे गंगापुजनानिमित्त भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह संपन्न झाला. ह.भ.प.अर्जुन महाराज लाड हे बुधवारी (दि.१९) काल्याच्या किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. त्यांनी संत तुकाराम महाराज यांचा 'अवघेची गोड जाले। मागीलये भरी आले।।१।। साहय जाला पांडुरंग। दिला अभ्यंतरीं संग ।।ध्रु.।। थडिये पावता तो वाव । मागे वाहावता ठाव ।।२।। तुका म्हणे गेले। स्वप्नींचे जागे जाले।।३।।' हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता. अर्जुन महाराज लाड म्हणाले, मधुकर महाराज खाडे यांच्या आग्रहास्तव मी होळला आलो आणि तब्बल



२५ वर्ष झाले वास्तव्यास आहे. आळंदीसारखे तीर्थक्षेत्र सोडून इथे राहिलो, त्याचे पूर्ण श्रेय मधुकर खाडे यांना जाते. त्यांच्या सोबतीला भास्करराव शिंदे असत. या जोडगोळीने संस्थेला आधार दिला. भगवान बाबा वारकरी वारकरी शिक्षण संस्था, वेदांत साधनास्थली आश्रम, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा व व्यायामशाळा ही मधुकर खाडे यांच्या कार्याची स्मारके आहेत. आश्रमाचा देशात नावलौकिक आहे. संप्रदायातील पाखवाज वादक मनोज सोळंके हे भारतात प्रथम आले. संतोष महाराज यांनी संगीतात गोल्ड मेडल मिळविले, याचे श्रेय मधुकर खाडे यांना जाते. त्यांनी व्यायामशाळेतून अनेक पैलवान घडविले, आता महाराष्ट्र केसरी, हिंद केसरी होतील असे मल्ल तयार केले. त्यांचा एक तरी शिष्य महाराष्ट्र केसरी व्हावा, तीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे मत ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांनी व्यक्त केले. यावेळी भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी –माजी विद्यार्थी, कीर्तनकार, भजनी मंडळी, कुस्ती क्षेत्रातील वस्ताद, पैलवान, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवछत्रपती व्यायामशाळेला दिली साडेचार लाखांची मदत

मधुकर महाराज खाडे हे भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सचिव होते. तसेच, त्यांनी होळ येथे शिवछत्रपती क्रीडा व व्यायामशाळेची स्थापना केली. परंतु ही व्यायामशाळा विकासापासून वंचित राहिली. त्यांना राजकीय मंडळींचे कसलेही सहकार्य लाभले नसल्याची खंत अर्जुन महाराज लाड यांनी व्यक्त करत आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत उपस्थितांनी व्यायामशाळेसाठी साडेचार लाख रुपयांची देणगी दिली.

पान ६ वरून...

### शिवजन्मोत्सव रक्तदान

रक्तदात्यांना चहा व नाश्त्याची सोय करण्यात आली होती. खोलेश्वर मल्टीस्टेट मुख्य कार्यकारी अधिकारी विलास पारेकर, खोलेश्वर मल्टीस्टेट मधील सर्व कर्मचारी आदी शिवभक्तांनी या रक्तदान शिबीरात अथक परिश्रम घेतले. शाळेच्या परिसरात केलेल्या गडकिल्ल्यांच्या देखाव्यामुळे परिसरातील वातावरण शिवमय झाले होते. दिंद्रुड येथील अशोक फरताडे यांनी हि माझी ६३ वी रक्तदान करण्याची वेळ असल्याचे सांगितले.महिलांचा उत्स्फूर्त सहभाग खोलेश्वर परिवाराच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला ०५ महिलांनी रक्तदान केले.

### मानवलोक समाजकार्य महाविद्यालयात

परिणाम होत आहे आणि सध्याच्या ग्लोबल वार्मिंग मुळे वातावरणामध्ये कसे चेंजेस होत आहेत आणि सद्यस्थितीमध्ये जी जगामध्ये परिस्थिती निर्माण झालेली आहे यांच्या कारणांची व परिणामांची दुष्काळ मुक्तीसाठी व शाश्वत शेतीसाठी केलेल्या कामाची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.डॉ. प्रकाश जाधव यांनी अध्यक्षीय समारोपात जगभरातून एकूण मृत्यू पैकी २३ टक्के मृत्यू हे पर्यावरणीय कारणामुळे होतात असे सांगितले.प्रास्ताविकात नजी शेख यांनी राष्ट्रीय परिषद आयोजनाबाबतचा उद्देश आणि महत्व विशद केले. उपस्थितांचे आभार डॉ. हनुमंत साळुंखे यांनी मानले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### शिवजयंती उत्साहात

माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी,माजी आ. पृथ्वीराज साठे,अमर देशमुख, ॲड.शोभा सुनिल लोमटे यांच्यासह सामाजिक,राजकीय पदाधिकारी,कार्यकर्ते व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंबाजोगाई शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकातून जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली. या काढण्यात आलेल्या मिरवणुकीत घोडे,उंट,विविध ढोलपथक,हलगी पथक,शिवकालीन पारंपारिक दांडपट्टे पथक,वासुदेव,आराधी गोंधळी,वारकरी, बालकांच्या –वेशातील शिवबा, जिजाऊ आणि फटाक्यांची आतषबाजी शिवभक्तांचे लक्ष वेधून घेत होते.

### शासकीय अध्यापक विद्यालयात

प्रखर समस्येकडे लक्ष वेधून त्यावर आधारीत पथनाट्य सादर करून जनजागृती करण्याचा प्रयत्न यामाध्यमातून केला. डी एल एड द्वितीय वर्षातील विज्ञान व गणित अध्ययन अध्यापनशास्त्र पाठ्यक्रमांतर्गत सामाजिक समस्या निवारणात पथनाट्य हे एक प्रभावी माध्यम सुचविण्यात आलेले आहे. प्रशिक्षणार्थ्यांनी प्रत्यक्ष पथनाट्याच्या माध्यमातून प्रात्यक्षिक करून सादरीकरण केले. या उपक्रमात द्वितीय वर्षातील कु. सुहानी पायाळ, कु.आरती तांगडे, कु.क्रांती तांगडे,कु. मोहिनी करांडे आणि कु.महेक शेख यांनी सहभाग घेतला. या पथनाट्यासाठी मराठी व उर्दू माध्यमातील प्रशिक्षणार्थ्यांनी प्रेक्षक म्हणून आस्वाद घेतला. याप्रसंगी डॉ. अब्दुल नजीब सर, श्री पुजारी सर, श्री धोंडगे सर, श्री पट्टेवाड सर, श्रीमती शेंडगे आणि श्री सावंत हे उपस्थित होते.

### पसायदान सेवा प्रकल्पास

माध्यमातून गोवर्धन दराडे आणि रंजनाताई दराडे हे करत आहेत. आज त्यांच्याकडे ८० ते १०० मुले शिक्षण घेत असून त्यांचे भविष्य घडवण्यासाठी पसायदान सेवा प्रकल्प दिशादर्शक ठरत आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन कै. साहेबराव अमृतराव नलावडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ संस्कृती विद्यालय व विवेक वर्धिनी गुरुकुल यांच्यावतीने पसायदान सेवा प्रकल्पास काकाई सेवा कार्य गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. दिनांक २२ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता संस्कृती विद्यालय म्हसोबा फाटा नगर रोड, बीड येथे मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे. या पुरस्कार सोहळ्यास उद्योजक नितीन कोटेचा, गोरक्षनाथ आबुज, आरटीओ अधिकारी निलेश पाटील, उपशिक्षणाधिकारी हजारे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजन समितीचे डॉ. दत्तात्रय नलावडे, दिगांबर नलावडे, अशोक नलावडे, माया जगताप, छाया निकम यांनी केले आहे.

### नारायणवाडीत विविध गुण प्रदर्शनाने

या कार्यक्रमाचा शुभारंभ गावकऱ्यांनी गावातील हनुमान मंदिरापासून ते माऊली संस्थान नारायणवाडी अशी सवाद्या वाद्यांमध्ये पारंपारिक रॅली काढून कार्यक्रमाचे मोठे आकर्षण मिळवले होते. ही राहिली संस्थांच्या सभागृहात आल्यानंतर माऊली संस्थानचे मठाधिपती महंत उद्धव महाराज शास्त्री यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून शिवप्रतिमेचे पूजनही करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून हभप. नाशिकेत महाराज जरे, उपसरपंच जगन्नाथ मोरे, पत्रकार शंकर भालेकर आदींची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिप.जोडवाडी शाळेचे शिक्षक भाऊसाहेब सटले सर, जिप.शाळा नारायणवाडीचे शिक्षक जवरे सर,बडे मॅडम यांच्यासह सतीश सटले सर , पत्रकार ज्ञानदेव शिंगटे,नाशिकेत काळे, ज्ञानेश्वर घिगे, कृष्णा शिंगटे, अजित गोंजारे, बाळू काळे तरुणांनी मोठी मेहनत घेतली होती.

गावभर ग्राम स्वच्छता अभियान

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती हा उत्सव नारायणवाडी,जोडवाडी, शास्त्रीनगर, भगवान नगर या चारही गावच्या ग्रामस्थांनी एक मोठा सण म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला आहे. अगदी सकाळपासूनच गावातील तरुणांच्या, गावकऱ्यांच्या सहभागातुन बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी ग्रामस्वच्छता अभियान राबवण्यात आले होते. गावामध्ये जिकडे तिकडे सडासमार्जन करून आपापल्या दारामध्ये रंगीबेरंगी रांगोळीची सजावट करण्यात आली होती. यामुळे अगदी सकाळपासूनच या गावांमध्ये मंगलमय वातावरण दिसून येत होते.

### रामनगर साखर कारखान्यातील सेवानिवृत्त

व्याजासह भरावी आणि संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या खात्याची संपूर्ण माहिती पुरवावी.

खा. डॉ. काळे यांनी यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे जालना आणि परिसरातील शेकडो सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.या बैठकीस जालना साखर कारखान्याचे श्री रामेश्वर डोंगरे, संतोष देशमुख, साहेबराव कांदे, दत्तू जुंबड, भिकाजी गवार, ज्ञानेश्वर औटे, एकनाथ पठाडे, अप्पासाहेब अवघड, अरुण वझरकर आदींची उपस्थिती होती.

cmyk

# पंढरपुरच्या शेतकऱ्याला दीड एकरात ६०० पोती रताळ्याचे उत्पादन

बेभरवशी उत्पन्न, हवामानात होणारे टोकाचे बदल आणि पिकाला अत्यल्प मिळणारा भाव अशा अनेक आव्हानांना तोंड देणाऱ्या महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांचा आता पारंपरिक पिकन ऐवजी नगदी, फळबाग किंवा प्रयोगशील पिकांचा आधार घेत अधिक उत्पन्न कमावण्याकडे कल दिसत आहे. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरच्या एका शेतकऱ्याने केवळ दीड एकरामध्ये रताळ्याचे उत्पादन घेऊन लाखोंचा नफा कमावलाय. या शेतकऱ्यांना पारंपारिक शेती आता सोडून दिली आहे . पारंपरिक पिकाच्या तुलनेत नगदी पिकातून चौकटीने उत्पन्न हा शेतकरी मिळवतोय.

पंढरपूरच्या बाबुळगावच्या सुधीर चव्हाण या शेतकऱ्याने पारंपारिक शेतीला फाटा मारत नगदी पिकं घ्यायला सुरुवात केली आहे. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या माहितीनुसार, रताळ्याच्या लागवडीचा खर्च प्रति एकर सुमारे ५००० रुपये आहे पण त्यातून मिळणार उत्पन्न हे लाखोंमध्ये असल्याचे सुधीर सांगतात. गेल्या वर्षी सुधीर चव्हाण यांनी १.५ एकरात रताळ्याचे उत्पादन घेतलं. ६०० पोती रताळ्याच्या उत्पादनातून तीन लाख रुपयांचे उत्पन्न सुधीर चव्हाण यांनी मिळवलं आहे.



कशी केली रताळ्याची शेती?

सुधीर चव्हाण यांनी सांगितलं, ५० गुंठे क्षेत्रात रताळे चांगले येतात. लागवड करण्यापूर्वी नांगरणी करून नंतर रोटावेटरने माती दोन-तीन वेळा नांगरल्यानंतर रताळ्याची रोपे लावतात. लागवडीपासून १२० ते १३० दिवसात ही रोपे तयार होतात. जेव्हा झाडांवरची पाने पिवळी पडतात तेव्हा कंद खोदले जातात. रताळ्याच्या चांगल्या जातीची पेरणी केल्याने चांगलं उत्पन्न मिळतं.

रताळ्याच्या कोणत्या जाती चांगल्या?

सध्या शेतकरी वर्षा, श्री नंदिनी, श्रीरत्न, श्री वर्धिनी, राजेंद्र रताळे ५, पुसा पांढरा, पुसा सूनहरी यासारख्या सुधारित रताळ्याच्या जाती वापरून अधिक चांगला भाव मिळतोय. रताळ्याच्या लागवडीसाठी जास्त पाणी किंवा खताची ही आवश्यकता नाही. या पिकाला अधिक काळजीची गरज नाही. हिवाळ्याच्या हंगामात बाजारपेठेतही रताळ्याला चांगली मागणी असते त्यामुळे पिकाला भावही चांगला मिळतो. असं सुधीर चव्हाण सांगतात.

देशात कुठे कुठे होतं रताळ्याचे उत्पादन?

रताळ्याचा जगभरातला प्रवास हा साहस योगायोगाने मानवी कुतूहलाचीच गोष्ट आहे. नवनवे प्रदेश शोधताना खलाशांनी समुद्री प्रवासात अन्नाचा विश्वासार्ह स्त्रोत म्हणून या पिकाची क्षमता ओळखली आणि ज्या प्रदेशात हे पीक गेलं तिथे या पिकाने तग धरला. भारतात उत्तर प्रदेश बिहार महाराष्ट्र पश्चिम बंगाल आणि ओडिसा मध्ये सर्वाधिक रताळ्याची लागवड केली जाते. हे बारमाही पीक असल्याचे तज्ञ सांगतात परंतु उन्हाळा आणि पावसाळा या पिकाच्या उत्पादनासाठी चांगला असतो.




## जागतिक दिवस
## सामाजिक न्याय दिवस

### महत्वाच्या घटना

१८४२ : जॉर्ज ग्रीनॉ याला शिवणाच्या मशिनचे पेटंट मिळाले.
१८४८ : कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंजल्स यांनी साम्यवादाचा जाहीरनामा 'द कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' प्रकाशित केला.
१८७८ : न्यू हेवन, कनेक्टिकट येथे पहिली टेलिफोन डिरेक्टरी प्रकाशित करण्यात आली.
१९१५ : लाहोर कट लाहोर, बनारस व मीरत या ठिकाणी सशस्त्र क्रांतिकारी उठाव झाला.
१९१६ : आजपासूनच वर्डन च्या युद्धाला सुरुवात झाली.
१९२५ : 'द न्यूयॉर्कर' या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९५२ : भारताचे पहिले सर्वसाधारण निवडणूक संपतात
१९५३ : तिलैया धारण अणि बोकारो वीज स्टेशन प्रधानमंत्री द्वारे उद्घाटन करण्यात आले होते
१९६७ : जिनिव्हा येथे नि:शस्त्रीकरण शिखर परिषद याच दिवशी पार
१९७२ : सोव्हिएत संघाचे मानवरहित अंतराळयान लुना २० हे चंद्रावर उतरले.
१९७५ : जयश्री गडकर व बाळ धुरी यांचा विवाह झाला!
२००१ : आजच्या दिवशी महाकुंभ मेळ्याचा समारोप झाला.
२००४ : लॉस टेनिस डब्ल्यू.टी.ए. मध्ये खिताब जिंकणारी सानिया मिर्झा पहिली भारतीय महिला खेळाडू बनली.
२०१३ : हैदराबाद मध्ये अनेक बॉम्बस्फोटांमध्ये किमान १७ जण ठार आणि ११९ जण जखमी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७५ : जीन काल्मेंट - १२२ वर्षे आणि १६४ दिवस जगलेली फ्रेन्च महिला (मृत्यू: ४ ऑगस्ट १९९७)
१८९४ : डॉ. शांतिस्वरुप भटनागर - वैज्ञानिक (मृत्यू: १ जानेवारी १९५५)
१८९६ : सूर्यकांत त्रिपाठी 'निराला' हिन्दी साहित्यिक. त्यांनी ४४ ग्रंथ लिहिले. कन्येच्या मृत्यूनंतर त्यांनी लिहिलेल्या 'सरोजस्मृती' या शोकगीताची हिन्दीतील सर्वश्रेष्ठ विलापिकांमध्ये गणना होते. (मृत्यू:१५ आक्टोबर १९६१)
१८९९ : प्रसिद्ध भारतीय कवी सुर्यकांत त्रिपाठी यांचा जन्म.
१९११ : भबतोष दत्ता - अर्थतज्ञ (मृत्यू: ११ जानेवारी १९९७)
१९४२ : जयश्री गडकर - अभिनेत्री (मृत्यू: २९ ऑगस्ट २००८)
१९४३ : ड्रीमवर्क्स चे सहसंस्थापक डेव्हिड गेफ्फेन यांचा जन्म.
१९७० : मायकेल स्लॅटर - ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९६१ : नोबेल पुरस्काराने सन्मानित अभिजित बॅनर्जी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२९ : चन्नम्मा - कित्तूरची राणी (जन्म: २३ आक्टोबर १७७८)
१८२९ : राणी चेन्नम्माचा मृत्यू झाला.
१९१३ : सेनापती व बंगालचे क्रांतिकारक वीरेंद्रनाथ यांना याच दिवशी फ़ाशी
१९६५ : 'माल्कम एक्स' - कृष्णवर्णीयांच्या हक्कांसाठी लढणारे अमेरिकन नेते (जन्म: १९ मे १९२५)
१९७० : मध्यप्रदेश चे माजी गव्हर्नर हरी विनायक पाटस्कर यांचे निधन.
१९७५ : गजानन हरी तथा राजा नेने- चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते व दिग्दर्शक (जन्म: १८ सप्टेंबर१९१२)
१९७७ : रा. श्री. जोग - साहित्य मीमांसक, कवी व विचारवंत (जन्म: १५ मे १९०३)
१९९१ : नूतन बहल - चित्रपट अभिनेत्री (जन्म: ४ जून १९३६)
१९९८ : ओमप्रकाश बक्षी ऊर्फ 'ओमप्रकाश' - चरित्र अभिनेते (जन्म: १९ डिसेंबर १९१९)
२०११ : अमेरिकन लेखक आणि पटकथालेखक व माईलस्टोन मीडिया चे सहसंस्थापक ड्वोन मॅकडफी यांचे निधन. (जन्म: २० फेब्रुवारी १९६२

# डाळिंब फुगवणीसाठी करा हे उपाय, मिळेल अधिक उत्पादन!



महाराष्ट्रात डाळिंब लागवडीखालील क्षेत्र हे मोठ्या प्रमाणात असून, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये डाळिंब लागवड मोठ्या प्रमाणात होते. राज्यातील शेतकरी डाळिंब पिकातून उत्पादनही अधिक मिळवतात. तसेच डाळिंबाला बाजारात मागणी देखील अधिक असते. मात्र, डाळिंबाला असलेली मागणी ही त्याच्या आकार आणि गुणवत्तेवरून असते. डाळिंबाचा आकार मोठा असेल तर त्याला दरही अधिक मिळतो.

फुगवणीसाठी काय करावे? :डाळिंब पिकाचे वेळेत व्यवस्थित व्यवस्थापन न केल्यास, त्याचा फळ गुणवत्तेवर आणि फुगवणीवर परिणाम होतो. त्यामुळे डाळींबाच्या वाढीच्या प्रत्येक अवस्थेत फळाच्या वाढीसाठी आणि रंगाच्या गुणवत्तेसाठी काही उपाय करणे गरजेचे असते. त्यासाठी डाळिंब पिकावर एखाद्या किडीचा किंवा रोगाचा प्रादुर्भाव दिसताच त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळेत उपाययोजना करावी. याशिवाय गुणवत्तापूर्ण डाळिंब उत्पादन मिळवण्यासाठी कॅल्शियम नायट्रेट ५ किलोग्रॅम आणि बोरोन १ किलोग्रॅम प्रति एकराच्या हिशोबाने ठिबकच्या माध्यमातून वेगवेगळ्या वेळी द्यावे. तर ऑर्थो सिलिकॉन ३%, १ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात पाण्यात मिसळून फवारणी करावी. याशिवाय एनपीके ०:५२:३४ हे ५ किलो प्रति एकराला आठवड्यातून एकदा ठिबकच्या माध्यमातून पिकाला पाणी देताना द्यावे. ज्यामुळे डाळिंबाच्या फुगवणीला मोठी मदत होते.

योग्य जातीची निवड : योग्य जातीची निवड करणे खूप गरजेचे असते. याशिवाय डाळिंब हे उष्णकटिबंधीय वातावरणातील फळ असून, अधिक काळापर्यंत उच्च तापमान राहिल्यास डाळिंबाच्या गोडीत आणि चवीत आणखी वाढ होते. याउलट दमट हवामानामुळे फळांच्या गुणवत्तेवर परिणाम होऊन, डाळिंबावर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढतो.

१. गणेश वाण : सध्या राज्यातील लागवडीखाली असलेले बहुतांश क्षेत्र हे 'गणेश' या वाणाखाली असून, हे वाण गणेशखिंड, फळ संशोधन केंद्र, पुणे या ठिकाणी डॉ. जी.एस.चीमा यांच्या प्रयत्नाने शोधून काढण्यात आले आहे. या वाणाचे वैशिष्टये असे की, बिया मऊ असून दाण्याचा रंग फिक्कट गुलाबी असतो. फळात साखरेचे प्रमाणही चांगले आहे. व या वाणापासून उत्पादन चांगले मिळते.

२. मृदुला वाण : डाळिंबाचे हे वाण 'गणेश' व 'गुल ए शाह रेड' या वाणांच्या संकरित पध्दतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केले आहे. या वाणाची फळे आकाराने मध्यम ३०० ते ३५० ग्रॅम वजनाची असून, फळांचा रंग व दाण्यांचा रंग गडद लाल असतो. बी अतिशय मऊ आणि दाण्यांचा आकार मऊ असतो. चवीला या वाणाचे डाळिंब जवळपास गणेश वाणासारखेच असते.३. भगवा वाण : महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे 'फुले भगवा सुपर' हे वाण राज्यात बऱ्याच ठिकाणी लागवडीत आहे. हे वाण गर्द केशरी रंगाचे असते. फळांची साल जाड व चकचकीत असून, दाणे मऊ आहेत. फळांमध्ये रसाचे प्रमाण भरपूर असते. फळांचे सरासरी उत्पादन २४ किग्रॅ. प्रति झाड आहे. देशांतर्गत तसेच निर्यातीसाठी ही जात उत्तम आहे.

# खरबुजाची लागवड करा, तीन महिन्यात लाखो रुपये कमवा

तुम्हाला जर कमी कालावधीत शेतीतून मोठी कमाई करायची असेल, तर खरबूज हे पीक तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. खरबुजाचा वापर हा कच्चे झाल्यावर भाजी म्हणून आणि पिकल्यावर फळ म्हणून देखील केला जातो. इतर फळांच्या तुलनेत हे स्वस्त असून त्याला मागणीही चांगली आहे. या पिकाची लागवड केल्यापासून अवघ्या तीन महिन्यात या पिकातून उत्पन्न सुरु होते. खरबुजाची लागवड प्रामुख्याने उत्तर प्रदेश, पंजाब, राजस्थान, हरियाणा, महाराष्ट्र, बिहार आणि मध्य प्रदेशातील उष्ण आणि कोरड्या भागात केली जाते. राजस्थानमध्ये खरबूजाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. त्याची लागवड प्रामुख्याने नद्यांच्या काठावर केली जाते. खरबुज हे एक स्वादिष्ट फळ असून उन्हाळ्यात या पिकाला मोठी मागणी असते. त्यात व्हिटॅमिन सी आणि साखर मुबलक प्रमाणात असते.

पेटा लागवड तंत्राचा वापर करून खरबूजाची लागवड : पेटा काष्टामध्ये संरक्षित पाण्याची मर्यादित उपलब्धता आणि जमिनीची उच्च सुपीकता यामुळे, खरबूज पिकामध्ये कोणतेही खत वापरले जात नाही. त्यामुळं खरबुजाचा नैसर्गिक सुगंध आणि चव कायम राहते. कडक उन्हात त्याच्या गोडव्याने लोकांना ताजेतवाने वाटते. यामुळेच लोक सामान्य खरबुजापेक्षा पेटा काष्टा खरबुजाला अधिक महत्त्व देतात. या गुणवत्तेमुळं पेटा काष्ठचे खरबूज बाजारात चांगल्या दरानं विकले जाते.



दोन ओळीमध्ये ४ फुटाचे अंतर

खरबुजाची लागवड करताना १० ते १५ सेमी आकाराचे खड्डे तयार केले जातात. दोन ओळीमध्ये ४ फुटाचे अंतर ठेवले जाते. एका रोपापासून दुसऱ्या रोपापर्यंतचे अंतर हे १ ते १.२५ फूट ठेवले जाते. पेटा काष्टामध्ये दक्षिण-पश्चिम दिशेला रेषा काढल्या जातात. उन्हाळ्यात, या दिशेने जोरदार वारे वाहतात, ज्यामुळे माती आणि आर्द्रता नष्ट होते. ही धूप रोखण्यासाठी, दोन ओळींच्या मध्ये कोरड्या स्थानिक वनस्पतींची एक पवनरोधक रेषा, सिनिया आणि खिंप, अशा प्रकारे उभी केली जाते की जोरदार वारा ओलावा उडवू नये.

या जातीच्या खरबूजाची लागवड फायदेशीर

'कजरी' जातीच्या खरबूजाची लागवड फायदेशीर ठरते. बहुतेक खरबूज बागेत पेरले जाते. अनेक कंपन्या आणि शेतकरी त्यांचे बियाणे स्वतः साठवून ठेवतात. कजरी जातीचा खरबूज गडद हिरव्या ते हलका तपकिरी रंगाचा असतो आणि त्यावर काळे आणि पांढरे पट्टे असतात. सरासरी, एका फळाचे वजन ५०० ग्रॅम ते १ किलो पर्यंत असते. कमी वजन आणि लहान आकारामुळे फळे जास्त काळ ताजी राहतात.

तीन महिन्यांत लाखोंची कमाई

पेरणीनंतर अडीच ते तीन महिन्यांनी खरबूज बाजारात विकायला मिळतात. फेब्रुवारी-मार्चमध्ये लागवड केलेल्या खरबुजाच्या बागेतून जूनपर्यंत आवक सुरू राहते. एक एकर खरबूज लागवडीतून शेतकरी २ लाख रुपयांपेक्षा जास्त नफा मिळवू शकतात.

# कलिंगड लागवडीच्या सुधारीत पद्धती

उन्हाळा सुरू झाला की लाल भडक आणि चवीला गोड अशा कलिंगडाची मागणी वाढते. कमी कालावधीत येणारे हे पीक शेतकऱ्यांना चांगला नफा मिळवून देते. फेब्रुवारीचा महिना कलिंगड लागवडीसाठी महत्त्वाचा समजला जातो. त्यामुळे शेतकरी जर कलिंगड लागवड करायचा विचार करत असतील तर सुधारित पद्धतीचा अवलंब केल्यास त्यांना नक्कीच गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळेल.

जमीन : मध्यम काळी, पाण्याचा योग्य निचरा होणारी, ६.५ ते ७ सामू असणारी, नदीकाठची पोयटा रेतीमिश्रित जमीन या पिकास योग्य ठरते. चुनखडीयुक्त, कार्बोनेट व बायकार्बोनेट विद्राव्य क्षार असलेली जमीन कलिंगड लागवडीसाठी योग्य नाही. लागवडीपूर्वी जमिनीची खोल नांगरणी करून प्रति हेक्टरी १५-२० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळून दोन वखराच्या पाळ्या द्याव्यात.

लागवड पद्धती : कलिंगडाची लागवड सरी पद्धतीने, आळे पद्धतीने किंवा गादी वाफा पद्धतीने करता येते. सरी पद्धतीने लागवड केल्यास २ मीटर अंतरावर सऱ्या पाडून वाफ्यावर ०.५ मीटर अंतरावर बिया लावाव्यात. आळे पद्धतीत ठराविक अंतरावर आळे करून त्यात शेणखत मिसळून मध्यभागी ४ ते ५ बिया टोकाव्यात. रुंद गादीवाफा पद्धतीने लागवड करताना ३ ते ४ मीटर अंतरावर सरी पाडावी. सरीच्या दोन्ही बाजूंना १ ते १.५ मीटरवर ३ ते ४ बिया लावाव्यात.

जाती : सध्या राज्यातील येऊ पाहणाऱ्या दुष्काळाची परिस्थिती बघता लागवडीसाठी कमी पाण्यावर व अल्प कालावधीत येणाऱ्या जातींची निवड योग्य ठरेल. यासाठी शेतकर्यांनी शुगर बेबी, मधू, अर्का माणिक, मिलन, अमृत, अर्काज्योती, अर्का राजहंस, अर्का जीत या जातींची निवड करावी.



मल्चिंग पेपरचा वापर :

मल्चिंग पेपर टाकण्यापूर्वी गादीवाफा एकसमान करून घ्यावा. मधोमध ठिबकची लॅटरल टाकावी. गादीवाफ्यावर ४ फूट रुंदीचा ५० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीचा मल्चिंग पेपर टाकावा. पेपर गादीवाफ्यावर समांतर राहील व ढिला होणार नाही याची काळजी घ्यावी. एक एकरासाठी साधारण ५ ते ६ किलो पेपर लागतो. लागवडीच्या एक दिवस आधी लॅटरलच्या दोन्ही बाजूंस १५ सेंमी अंतरावर रोपे लावण्यासाठी पेपरला छिद्रे पाडून घ्यावीत. दोन रोपांमधील अंतर २ फूट ठेवावे. त्यानंतर गादीवाफा ठिबक सिंचनाच्या साह्याने ओला करून घ्यावा. छिद्रे पाडलेल्या ठिकाणी योग्य वाढीच्या रोपांची लागवड करावी. लागवडीच्या टोकणपद्धती मध्ये बियाण्यांची उगवणक्षमता कमी राहते. न उगवलेल्या ठिकाणी पुन्हा बी टोकावे लागते. पर्यायाने खर्चात वाढ होते. त्यामुळे शक्यतो रोपे कोकोपीट ट्रेमध्ये तयार करून लागवड करावी.

बियाणे आणि बीजप्रक्रिया : प्रती हेक्टरी साधारणतः सरळ वाणाचे २.५ ते ३ किलो, तर संकरित जातींचे ७५०-८७५ ग्रॅम बी पुरेसे होते. बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी बिया कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लीटर पाणी या द्रावणात ३ तास भिजवून घ्याव्यात. बियांचे आवरण टणक असल्यामुळे उगवण क्षमता वाढवण्यासाठी त्याच बिया नंतर ओलसर पोत्याच्या गुंडाळीत १२ तास ठेऊन नंतर लागवडीसाठी वापराव्यात.

खत व्यवस्थापन : कलिंगड पिकास प्रति हेक्टरी ५०:५०:५० किलो नत्र, स्फुरद व पालाश गरजेचे असते. त्यातील अर्धे नत्र व संपूर्ण स्फुरद आणि पालाशची मात्रा लागवडीच्या अगोदर वाफे बनवताना द्यावी. उर्वरित नत्राची मात्रा लागवडीनंतर १, १.५ आणि २ महिन्याने तीन समान हप्त्यांमध्ये विभागून द्यावी.

विद्राव्य खत व्यवस्थापन : पीक १५ दिवसाचे झाले असता १९:१९:१९ २-३ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यातून फवारणी करावी. पहिल्या फवारणीनंतर ३० दिवसांनी सूक्ष्मअन्नद्रव्ये ग्रेड नं. २ ची २.५- ३ ग्रॅम प्रतिलिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. पीक फुलोरा आणि फळ धारणा अवस्थेत असताना ००:५२:३४ ची ५ ग्रॅम प्रति लीटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. बोरॉनच्या कमतरतेमुळे फळे तडकण्याचे प्रमाण वाढते त्यामुळे फुलोरा अवस्थेत ००:५२:३४ सोबत सूक्ष्मअन्नद्रव्यांची फवारणी केल्यास पिकांना बोरॉनची उपलब्धता होते. फळ पोसत असताना १३:००:४५ या विद्राव्य खताची ५ ग्रॅम प्रति लीटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी

फुलगळ आणि फळगळ व्यवस्थापन : अनियमित सिंचन व पाण्याची अयोग्य मात्रा यामुळे फुले व फळांची गळ होऊ शकते, तसेच फळे सुद्धा तडकतात. हे टाळण्यासाठी जमिनीच्या मगदूराप्रमाणे पाण्याची मात्रा व वेळ निश्चित करावी. फळ लागण्यास सुरवात झाल्यास पाण्याचा ताण बसू देऊ नये. पाणी दुपारच्या वेळी देऊ नये.


cmyk



# माजलगाव शहरातील स्वच्छतेचे तीनतेरा!

## स्वच्छता कंत्राटदाराच्या नोकराची नागरीकांना अरेरावी;शहरातील कंत्राटदार बदला; नागरिकांची मागणी







माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगरपालिकेतील मुख्याधिकारी तथा प्रशासक अगोदर च पालिकेत येत नसल्यामुळे माजलगाव नगरपालिकेच्या अंतर्गत होणाऱ्या कामांचा बोजवारा उडाला आहे. त्यातच माजलगाव शहरात असणारी घाण, स्वच्छतेअभावी तुंबलेल्या गटारी, रस्त्यावर टाकलेला कचरा या सर्व बाबींमुळे शहराच्या सौंदर्याचे विद्रुपीकरण व शहराच्या प्रदूषणात वाढ होत असून याकडे नगरपालिका प्रशासनाचे गांभीर्यपूर्ण दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

एखाद्या स्वच्छता कर्मचाऱ्याला रस्त्यावरील कचरा उचलण्यास सांगितला तर शहरात स्वच्छतेसाठी पालिका प्रशासनाने नियुक्त केलेल्या कंत्राटदाराचा नोकर तर चक्क नागरिकांना सुद्धा अर्वाच्य व अरेरावीची भाषा वापरत आहे. तसेच कंत्राटदाराकडून उचलण्यात येणारा कचरा डम्पिंग मैदानावर न टाकता माजलगावच्या बायपास रस्त्यावर टाकून जाळण्यात येतो यामुळे शहराच्या प्रदुषणात वाढ होऊन नागरिकांना श्वसनाच्या विकारामध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

परंतु या सर्व बाबींबद्दल न.प.पालिका प्रशासनास किंवा स्वच्छता प्रमुखास विचारले तर ते कंत्राटदाराच्या त्याच नोकरास फोन करतात परंतु तो त्यांनाही न जुमानता अरेरावीची व अर्वाच्य भाषा वापरतो.या सर्व गोष्टींमुळे शहराचा विकास खुंटत असून याकडे नगरपालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक यांनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. व लवकरात लवकर स्वच्छतेचे कंत्राटदार बदलून दुसऱ्यांना कंत्राट देणे सुद्धा तेवढेच गरजेचे आहे अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

### कंत्राटदाराच्या नोकराची अरेरावीची भाषा

वरील सर्व प्रकाराबद्दल विचारण्यासाठी कंत्राटदाराच्या कडून स्वच्छतेच्या देखरेखीसाठी नेमण्यात आलेल्या बिलाल सय्यद यांना संपर्क केला असता,'एक टोपला कचरा राहिला तरी परेशान करता आणि ज्यादा शानपणा नका करू, तुम्हाला काय करायचे ते करा..!' अश्या भाषेत त्यांनी न.प.च्या स्वच्छता विभाग प्रमुख यांच्यासमोर असे उत्तर दिले.

### कचरा उचलण्यास सांगितला असता पैशांची मागणी

शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकात असलेल्या मोठ्या कॉम्प्लेक्ससमोर पडलेला कचरा उचलण्यास सांगितला असता ट्रॅक्टर चालक यांनी तेथील नागरिकांना १०००/- रुपयांची मागणी केली.पैसे दिले तरच कचरा उचलला जाईल नाही तर उचलणार नाही असे त्या ट्रॅक्टर चालकाने म्हटले.

## यशासाठी शिवचरित्र कृतीत उतरवावे : भास्कर दानवे



जालना। प्रतिनिधी

प्रतिकूल परिस्थिती प्रचंड आव्हाने ,संकटांचा सामना करण्याचे बळ छत्रपती शिवरायांच्या चरित्रातून मिळते. जीवनात यशस्वी होण्यासाठी शिवरायांच्या विचारांवर मार्गक्रमण करावे. असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे नेते भास्करराव पाटील दानवे यांनी केले.

व्ही. एस. एस. इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयात शिवजयंती सोहळा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. भास्करराव पाटील दानवे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच प्राचार्य डॉ. प्रसाद मदन यांच्या अध्यक्षतेखाली ॲड. वैशाली कडू यांचे व्याख्यान झाले. भाजपाचे जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे ,गोवर्धन कोल्हे, प्राचार्य गुलशन राठी, यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. ॲड. वैशाली कडू यांनी सर्व घटकांना समान न्याय देणारे छत्रपती शिवरायांची प्रेरणा जगाने घेतली असून युवा पिढीने व्यसनांच्या आहारी न जाता शिवनीतीचा अवलंब करावा असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.प्रसाद मदन यांनी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर शिवचरित्र हे प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन गीतांजली अंभोरे व शिवानी नळगे यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.



**अंबड : नगरपरिषद कार्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज शिवजयंती साजरी करण्यात आली यावेळी जितेंद्र देशमुख ,गोपाल चौधरी, रामदास मांडवे , विनोद भाडमुखे, आत्माराम सागळे, उमेश खरात विनोद मगरे, रणजीत चुंगडे यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.**

## पाटोद्यातील छत्रपती चषकात वहाली केंद्र संघ विजय

पाटोदा। प्रतिनिधी

विश्ववंद्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने गटशिक्षणाधिकारी कार्यालय पाटोदा व लोकनेते गोपीनाथराव मुंडे शिक्षक सह पतसंस्था मर्या पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित छत्रपती चषक शिक्षकांच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, तालुक्यातील सर्व केंद्रातील टीमचे अतिशय चुरशीचे सामने पहावयास मिळाले या मध्ये १९ फेब्रुवारी रोजी वहाली केंद्र व डोमरी केंद्र यांच्यात अंतिम सामना झाला या स्पर्धेचे टॉस तहसीलदार निलावड साहेब, नगराध्यक्ष राजू जाधव, मा.सभापती संदीप जाधव,मा.नगरसेवक बालाजी जाधव, युवानेते जितेंद्र भोसले, यांच्या उपस्थितीत संपन्न झाला या सामन्यात वहाली केंद्राने प्रथम तर डोमरी केंद्राने द्वितीय क्रमांक पटकावला,याप्रसंगी ट्रॉफी व बक्षीस वितरण करताना पाटोदा तहसील कार्यालयाचे



तहसीलदार निलावाड साहेब पाटोदा नगरीचे नगराध्यक्ष राजू भैया जाधव, गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे हनुमंत गव्हाणे साहेब सर्व केंद्रप्रमुख मुख्याध्यापक पतसंस्थेचे आजी-माजी पदाधिकारी व सर्व खेळाडू शिक्षक वृंद उपस्थित होते अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा संपन्न झाल्या आलेल्या सर्व मान्यवर व खेळाडूंचे आभार लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सह पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र गोरे सर यांनी मानले

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/५२
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०६/०२/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) दादासाहेब दत्तू ठोंबरे सर्व्हे नं. ८१/१ प्लॉट नं. १६४ न.प.मि.न.१८ -७० -१६४/१ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१६४) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- बाबुराव पिराजे यांचा प्लॉट नं १६३
पश्चिम :कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- प्लॉट नं. १४४
उत्तर : प्लॉट नं. १६४/२
मधील लबडे कुटुंबियाचे घर

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

जा.क्र./बीनप/कावि/वसुली-कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक २१/०२/२०२५

**जाहीरनामा**

कोर्ट वारस मृत्यू प्रमाणपत्र ख.खत अधारे

प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता १)सुभद्राबाई सहदेव साबळे २) प्राजक्ता पि.सहदेव साबळे ३) प्रतिक पि.सहदेव साबळे

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, सव्हे नं.- २०३ पैकी तरफ पिंगळे क्षेत्र-२७८.८१ चौ.मी. प्लॉट नंबर २२ सहदेव बापुराव साबळे मयत बीड चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतुः सिमा
मृत्यू प्रमापणत्र अधारे

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**

जा.क्र./बीनप/कावि/वसुली-कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक २१/०२/२०२५

**जाहीरनामा**

स्थावर मिळकतीचा हिबानामा (बक्षीस पत्र) अधारे

प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता १)शेख आमेर पि.शेख हुसेन २. शेख अमन पि. शेख हुसेन ३)शेख अमिन शेख हुसेन ४)शेख रेहान शेख हुसेन ५)अ.पा.क.आई नामे रहमा भ्र शेख हुसेन

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र. ३/५/१७४ पैकी क्षेत्र-६९.७० चौ.मी. श्री/सौ. शेख हुसेन पि. शेख रशिद बीड चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतुः सिमा
पूर्व-शेख अनिस शेख रशिद यांचे घर
पश्चिम- शेख अकबर यांचे घर
दक्षिण - ३ फुटाची गल्ली व
अब्दल रहिम यांचे घर , उत्तर - १५ फुटाचा रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**

## कर्माचे भोग हे भोगावेच लागतात-राहुल महाराज

जालना। प्रतिनिधी

कर्माचे भोग हे भोगावेच लागतात. ते कोणालाही सुटलेले नाही. मग कर्म करणार्याला वाटत असेल की, माझ्याकडे कोणीही पाहत नाही. परंतू हे चुकीचे आहे. असा हितोपदेश हभप राहुल महाराज जोशी यांनी येथे बोलतांना दिला. दरम्यान, आज रात्री हभप त्रिंबक महाराज दस्तापूरकर यांचे हरिकिर्तन होणार आहे.



श्री. जोशी महाराज सहकार बँक कॉलनीत आयोजित अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त आयोजित केलेल्या भागवत कथेचे सहावे पुष्प गुंफतांना ते बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, शेवटी कंसाचे खुप हाल झाले. त्याला मारणारा दुसरा तिसरा कोणी नसून खुद्द भगवान परत्मा कृष्ण होते. कंसाच्या दशा आपण पाहिली आहे, ऐकली आहे. म्हणूनच भक्ती करावी तर भगवान परत्मा श्री कृष्णाची करावी, यावेळी जोशी महाराजांनी गायिलेल्या भजनाला श्रोत्यांनीही भरभरुन प्रतिसाद दिला. छोटी छोटी गया छोटे- छोटे गॉल याच बरोबर त्यांनी यावेळी अनेक भजनं गायिली. कीर्तन सेवेत आज हभप श्री रसाळ महाराजांनी यांनी जग्तगुरु संत तुकाराम महाराजांच्या अंभगावर निरुपन केले. ते म्हणले की, आज काल सुख कोठे आहे, तर ते फक्त भगवंतांच्या भक्तीमध्ये आहे. म्हणूनच भगवंत भक्तीचा विसर पडू देऊ नका, असेही रसाळ महाराज म्हणाले. यावेळी विश्वस्त मंडळचे सचिव श्री संपतराव पाटील, मंडळाचे अन्य पदाधिकारी व कॉलनी भाविकांसह हभप शिरीष सांगोळे, तुकामरा मुंडे, आत्माराम बिडवे आदींची उपस्थिती होती. दरम्यान, या सप्ताहाचा उद्या शुक्रवारी सांगता सभारंभ होणार आहे. काल्याचे किर्तन हभप डॉ. भगवान महाराज आनंदगडकर महाराज यांचे होईल. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. तत्पूर्वी संपूर्ण कॉलनीतून पालखी (दिंडी) सोहळा निघणार आहे. या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मॉडेल इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात



माजलगाव। प्रतिनिधी

सिंदफणा एज्युकेशन सोसायटी संचलित मॉडेल इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आधारित नाटके आणि नृत्य सादर केले यामध्ये लावणी शेतकरी नृत्य पंजाबी नृत्य अशा कलाविष्कारांचा समावेश करण्यात आला होता. उद्घाटन पर कार्यक्रमाचे अध्यक्ष सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ एम.ए.कव्हळे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ होते.मॉडेल इंग्लिश स्कूल ही सिंधफना एज्युकेशन सोसायटीची एक महत्त्वपूर्ण शाखा असून सोसायटीचे अध्यक्ष माजी आ. राधाकृष्ण होके पाटील,सचिव डॉ.प्रकाश आनंदगावकर,उत्तमराव प्रधान , बारटक्के,आर. एम. कांबळे सर,श्री जुनेद खान,श्रीमती अकोलकर ,अभय होके,प्रा.रामपूरकर, नितीन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे प्राचार्य बी. एम.जरे , पर्यवेक्षिका श्रीमती सुलभा मॅडम, सांस्कृतिक विभाग प्रमुख अमोल गायकवाड यांच्यासह उबेद खान,संदीप वाघमारे आणि शाळेचे इतर सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्नेहसंमेलन यशस्वी पार पाडले. कार्यक्रमांमध्ये शाळेचा वार्षिक अहवाल शाळेचे प्राचार्य जरे यांनी सादर केला तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.मोमीन अरायना, सिद्दिकी सतिरा, सय्यद मारिया आणि शेख सजिया या विद्यार्थिनींनी केले.तसेच विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी सिद्दिकी सतिरा व मोमीन अरायणा यांचाही सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

## जालना जिल्हा मध्यवर्ती बँकेत शिवजयंती साजरी

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहा साजरी करण्यात आली यावेळी बँकेचे अध्यक्ष श्री सतीश भाऊ टोपे बँकेचे कार्यकारी संचालक श्री आशुतोष जी देशमुख यांनी दीप प्रज्वलन करून पुष्पहार अर्पण केले यावेळी उपस्थितांचे स्वागत मुख्य शाखेचे व्यवस्थापक श्री सदशिव कोल्हे यांनी केले शिवजयंती निमित्त विभाग प्रमुख श्री कांता भुतेकर भागवत भांदर्गे विश्वनाथ जाधव सुरेश केसापुरी कॅशियर किशोर खिल्लारे काकासाहेब भडांगे सचिन आंबेकर अविनाश



टपरी संजय खरात सतीश लोमटे मकरंद दाभाडकर श्याम पवार रामसिंग राठोड संदीप राठोड सुभाष गोडबोले प्रकाश लांडगे सुनील नंदा गिरी भगवान कालबिले शेलार विष्णू मोरे गव्हाणे गोरंट्याल आसटकर तसेच बँकेचे कर्मचारी आणि आयटी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते आभार प्रदर्शन मुख्य शाखा व्यवस्थापक श्री सदाशिव कोल्हे यांनी केले

# आजपासून श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान महाशिवरात्री महोत्सवास प्रारंभ

## सप्ताह सोहळ्याचा लाभ घ्यावा; महंत शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मौजे बेलगाव पो. लिंबागणेश याठिकाणी दि.२० ते २७ फेब्रुवारी दरम्यान महाशिवरात्री महोत्सव संपन्न होत आहे. त्या प्रित्यर्थ अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड विनावादन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवाचा अखंड पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन मार्गदर्शक श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मठाधिपती ह.भ.प. महंत महादेव बाबा भारतीजी व कार्यक्रमाचे आयोजक ह.भ.प.शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती



, महोत्सव कमिटीने केले आहे. आज दि.२० गुरुवार रोजी महोत्सवास प्रारंभ झाला असुन सकाळी भगवान बेलेश्वर महादेवास अभिषेक,ध्वजपुजन करत श्री गणपती पुजनास सकल संतांचे वंदन केले.त्यानंतर वीणा,पखवाज,पेटी यांचे पुजण करण्यात आले. समस्त भाविक भक्तांच्या उपस्थितीत वीणा उभारण्यात आला. महोत्सव कमिटीच्या वतीने पंचक्रोशीतील उपस्थित सरपंच, उपसरपंच, गावातील प्रतिनिधी यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

ह.भ.प. शिवचरित्र बबन महाराज मंझरीकर हवेली ,दि.२१ शुक्रवार रोजी ह.भ.प. युवा किर्तनकार अक्षय महाराज पिंगळे बीड,दि.२२ शनिवार रोजी ह.भ.प. रामायणाचार्य एकनाथ महाराज गाडे चकलांबा दि.२३ रविवार रोजी ह.भ.प.वारकरी भुषण राम महाराज डोंगर आळंदी,दि.२४ सोमवार रोजी ह.भ.प. रामहरी महाराज वायबसे सावरगाव ( सोने) दि.२५ मंगळवार रोजी ह.भ.प. प्रेममुर्ती धर्मराज ( दादा) महाराज श्रीक्षेत्र सामनगाव गुरूपीठ,दि.२६ बुधवार रोजी ह.भ.प.विनोदाचार्य दिपक महाराज बादाडे माजलगाव यांचे किर्तन होणार असुन दि.२७ गुरुवार रोजी ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे , अध्यक्ष बंकटस्वामी संस्थान नेकनुर यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने सांगता होणार आहे.

### विविध धार्मिक कार्यक्रम

बेलेश्वर संस्थान बेलगाव येथील महाशिवरात्री महोत्सवात काकडा,भजण, शिवलीलामृत पारायण, गाथा पारायण, भावार्थ रामायण, हरिपाठ,हरिकिर्तन,जागर अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन या सप्ताहात लिंबागणेश पंचक्रोशीतील भजणी मंडळ उपस्थित राहणार आहेत.

cmyk

राज्य लोकतंत्र
शुक्रवार, दि.२१ फेब्रुवारी २०२५ | ६

# शेतकऱ्यांनी शेती कामामध्ये ट्रॅक्टर व आधुनिक अवजारांचा वापर करावा - आ. सुरेश धस

## स्वराज ट्रॅक्टर शोरूमचे उद्घाटन आ सुरेश धस यांच्या हस्ते तर माजी आ बाळासाहेब आजबे, माजी आ भीमराव धोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी येथील सावळेश्वर ट्रॅक्टर्स शोरुम धोंडे पेट्रोल पंपासमोर सुरू केले असून या शोरूमचे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर आ सुरेश धस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले यावेळी माजी आ बाळासाहेब आजबे, माजी आ भीमराव धोंडे, मुरलीधर आजबे,सतीश शिंदे, बद्रीनाथ जगताप, डॉ शिवाजी राऊत, काकासाहेब शिंदे, भाऊसाहेब घुले,सरपंच सुधीर पठाडे, दत्तात्रय खोटे,बबन कराडे, दादासाहेब जगताप, सुनिल सुर्यवंशी, सुभाष गणगे, सेवा निवृत्त नायब तहसीलदार गिते साहेब,पै फिरोज बागवान आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ सुरेश धस म्हणाले की शेतकऱ्यांनी अण्णासाहेब पाटील विकास महामंडळ व सबरी आणि महात्मा फुले विकास महामंडळ या योजनेचा लाभ घेऊन आपल्या शेतीच्या कामासाठी ट्रॅक्टर खरेदी करावा आणि स्वराज ट्रॅक्टर योग्य असून त्यांचा वापर योग्य पद्धतीने करावा रमेश दादा आजबे हे शेतकरी व सर्वसामान्य घटकांना सवलत नक्कीच देतील आणि त्यांचे शोरुम अनेक जिल्ह्यांत असून ते योग्य उद्योजक म्हणून त्यांनी नावलौकिक



मिळविला आहे ते शेतकऱ्यांना योग्य किमतीत ट्रॅक्टर देत आहेत आणि सहकार्य करत आहेत तर शेतकऱ्यांनी शेती कामामध्ये ट्रॅक्टर व आधुनिक अवजारांचा वापर करावा असे प्रतिपादन आ सुरेश धस यानी बोलताना केले.यावेळी माजी आ बाळासाहेब आजबे व माजी आ भीमराव धोंडे यांनी शोरुमच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.स्वराज ट्रॅक्टरचे डिलर रमेश आजबे यांनी मान्यवरांचे स्वागत केले व आभार मानले. या कार्यक्रमास सरपंच परिवत गायकवाड, सुभाष गणगे,के के काकडे,गणेश डोके,अकरम सय्यद, सलमान बागवान,गणेश डोके,जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, अविनाश कदम, राजेंद्र लाड, अक्षय विधाते, संतोष नागरगोजे, सोपान पगारे आदी शेतकरी, नागरिक, व्यापारी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी पहिल्याच दिवशी १९ ट्रॅक्टरची केली खरेदी

आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी प्रथमच स्वराज ट्रॅक्टरचे अधिकृत डिलर सावळेश्वर ट्रॅक्टरचे डिलर रमेश दादा आजबे यांनी ग्राहकांना आकर्षक व्याजदर,आकर्षक किंमत व आकर्षक ऑफर दिल्याने सवलतीचा पहिल्याच दिवशी १९ ट्रॅक्टरची शेतकऱ्यांनी खरेदी केली.आकर्षक सवलत दिल्याने शेतकऱ्यांनी डिलर रमेश दादा आजबे यांचे आभार मानले.

# शिवजन्मोत्सव रक्तदान करत साजरा

## दिंद्रुडच्या खोलेश्वर परिवाराचा आदर्श उपक्रम

दिंद्रुड । प्रतिनिधी

रक्ताचा तुटवडा भरून निघण्यासाठी खारीचा वाटा उचलत सलग पाचव्या वर्षीही शिवजन्मोत्सवाचा सण रक्तदान करून साजरा करण्याचा संकल्प दिंद्रुड येथील खोलेश्वर परिवाराने पूर्ण केला. बुधवारी छत्रपती शिवाजी महाराजांचा ३९५ व्या शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित रक्तदान शिबीराचे उद्घाटन खोलेश्वर परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पारेकर यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या प्राचार्या सरिता फपाळ, उपाध्यक्ष प्रकाश



कुलकर्णी, मुख्यकार्यकारी अधिकारी विलास पारेकर सह दिंद्रुड पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक या प्रसंगी उपस्थित होते. शिबिरात २०२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

खोलेश्वर परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पारेकर यांच्या संकल्पनेतून गेल्या पाच वर्षांपासून शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन १९ फेब्रुवारीला करण्यात येते. परळी येथील वैद्यनाथ रक्त पेडी चे तंत्रज्ञ बिबीशन सांगळे,भाविका गाथे यांनी २०२ तरुण-तरुणींचे रक्तदान करवून घेतले. दिंद्रुड व पंचक्रोशीतील शिवभक्तांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवला. सर्व रक्तदात्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची रेखीव प्रतिमा व सहभाग प्रमाणपत्र याप्रसंगी देण्यात आले.खोलेश्वर परिवारातर्फे ◀◀ पान ३ वर

# मानवलोक समाजकार्य महाविद्यालयात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर विद्यार्थी विकास मंडळ व मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने पर्यावरणाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम आव्हाने समस्या व उपाय या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न झाली.

दोन दिवशीय परिषदेचे उद्घाटन अंबाजोगाईचे वनपाल गोविंद कस्तुरे घाटनांदुरच्या वसुंधरा महाविद्यालयाचे भुगोल विभागप्रमुख डॉ. सखाराम वाघमारे, समाज विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश




जाधव डॉ. नजीर शेख व डॉ. हनुमंत साळुंके यांच्या उपस्थितीत झाले. दोन दिवसांमध्ये एकूण तीन सत्रच्या माध्यमातून ही परिषद झाली

उद्घाटन प्रसंगी गोविंद कस्तुरे यांनी वाढत्या प्रदूषणामुळे व विषारी औषधामुळे पाण्यातील प्रजाती तसेच उभयचर प्राणी पाळीव प्राणी वन्यजीव प्राणी यांच्यासाठी जास्तीत जास्त झाडांची संख्या वाढून मराठवाड्यात व मराठवाड्याच्या बाहेर वनसंपदा मोठ्या प्रमाणात निर्माण करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले.

डॉ. सखाराम वाघमारे यांनी पर्यावरणीय ऱ्हासामुळे थेट आरोग्य धोके निर्माण होतात हवामान आणि पूर हे असंसर्गजन्य रोगामध्ये एक प्रमुख घटक निर्माण करतात आणि एकूण जल प्रदूषण भूमी प्रदूषण व वायू प्रदूषण यामुळे मानवाच्या आरोग्यावर वेगवेगळ्या पद्धतीने परिणाम होतो तसेच सध्या वाढत्या लोकसंख्या मुळे आणि वाढत्या शहरीकरणामुळे जंगलांचा ऱ्हास होत आहे असे त्यांनी सांगितले. मराठवाडा समन्वयक पाणी फाउंडेशनचे संतोष शिनगारे यांनीही मनोगत व्यक्त केले जागतिक पर्यावरणाचा व हवामान बदलाचा वेगवेगळ्या देशावर कशा पद्धतीने ◀◀ पान ३ वर

# शिवजयंती उत्साहात साजरी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अंबाजोगाई शहरात उत्साहात साजरी करण्यात आली.

जयंती निमित्ताने शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातून निघालेल्या मिरवणुकीत पारंपारिक लोककला, पारंपारिक वाद्य आणि डिजे या सर्व प्रकारांनी शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त सकाळी चौकात महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून




स्वराज्याचा भगवा ध्वज फडकवून ध्वजारोहण करण्यात आले. जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रणजित लोमटे,बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष (अजित पवार) राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, ◀◀ पान ३ वर

# अर्णव कांबळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रूड येथील खोलेश्वर (विद्यालय) परिवाराच्या वतीने तिसरी ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये इयत्ता तिसरीच्या वर्गातून येथील पत्रकार नवनाथ कांबळे यांचा मुलगा अर्णव कांबळे हा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला असून, येथे तिसरी ते नववी पर्यंतचे जिल्हा व जिल्हाबाह्य विद्यार्थी शिष्यवृत्ती पूर्व परीक्षेला बसले होते. यामध्ये तिसरी ते नववी तील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रत्येकी प्रथम व टॉप टेन नंबर काढण्यात आले.



या शिष्यवृत्ती पूर्व परीक्षेसाठी जिल्ह्यासह परिसरातून तब्बल २६५७ विद्यार्थी सहभागी झाले होते. इयत्ता तिसरी ते नववी पर्यंतच्या वर्गातून टॉप वीस विद्यार्थ्यांची निवड शिष्यवृत्तीसाठी करण्यात आली. परीक्षेचा निकाल अवघ्या तीन तासात जाहीर करण्यात आला. इयत्ता तिसरीच्या वर्गातून अभिनव इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी पत्रकार नवनाथ कांबळे यांचा मुलगा अर्णव कांबळे हा पहिला आल्यामुळे त्याचा खोलेश्वर विद्यालयाच्या वतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीपराव पारेकर यांच्या वतीने पुष्पगुच्छ व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी बहुतांश पालक वर्ग व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# पसायदान सेवा प्रकल्पास काकाई सेवा गौरव पुरस्कार जाहीर

## गोवर्धन दराडे, रंजनाताई दराडे यांचा २२ फेब्रुवारीला होणार सन्मान

बीड । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून वंचित, बेघर, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले आणि भटक्या विमुक्तांच्या मुलांचा नाथ बनवून पसायदान सेवा प्रकल्पाच्या माध्यमातून गोवर्धन दराडे आणि





रंजनाताई दराडे सांभाळ करतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन यंदाचा काकाई सेवाकार्य गौरव पुरस्कार पसायदानला जाहीर झाला आहे. दिनांक २२ फेब्रुवारी रोजी संस्कृती विद्यालय बीड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

ढेकणमोह शिवारातील डोंगराच्या पायथ्याशी गेल्या पंधरा वर्षापासून पसायदान सेवा प्रकल्प कार्यरत आहे. बेघर, वंचित, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, पालावरील मुले त्याबरोबरच भटक्या विमुक्तांच्या मुलांचा सांभाळ पसायदान सेवा प्रकल्पाच्या

◀◀ पान ३ वर

# शासकीय अध्यापक विद्यालयात प्रशिक्षणार्थी अध्यापकांनी दिले सायबर क्राईमवर पथनाट्यातून धडे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शासकीय अध्यापक विद्यालय, नेकनूर येथे दि. १७-०२-२०२५ रोजी डी एल एड द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थ्यांद्वारे सायबर क्राईम या समस्येवर आधारीत पथनाट्य सादर करण्यात आले.**

शासकीय अध्यापक विद्यालय,नेकनूर हे मराठवाड्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षक होण्याचे स्वप्न पूर्ण करण्याचे कार्य मागील पाच दशकापेक्षा अधिक काळापासून कार्य करत आहे. विद्यालयात अध्यापन







कार्याबरोबरच विविध उपक्रमांची कायम रेलचेल असते. केवळ पुस्तकी ज्ञानार्जन न करता शिक्षकांस सामाजिकतेचे भान असणे गरजेचे असते, यासाठी समाजातील विविध समस्या जसे बालविवाह, स्त्री भ्रूणहत्या,अंधश्रद्धा,निरक्षरता आतंकवाद ई. सारख्या समस्या आज समाजविकासात अडसर ठरत आहेत. याची जाणीव ठेवून अध्यापक विद्यालयातील द्वितीय वर्ष (मराठी माध्यम) प्रशिक्षणार्थ्यांनी सायबर क्राईम या सध्यस्थितीतील

◀◀ पान ३ वर

# रामनगर साखर कारखान्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या तात्काळ मार्गी लावा -खा. डॉ. कल्याण काळे

**जालना । प्रतिनिधी**

**जालना साखर सहकारी कारखाना तील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडून यासाठी खा. डॉ. कल्याण काळे यांनी क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त कौशल सिंग यांच्यासोबत बैठक घेऊन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या तातडीने सोडवण्याच्या दृष्टीने आवश्यक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आली आहे.**

या बैठकीत निवृत्तीवेतन, भविष्य निधी आणि इतर थकबाकीच्या प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. जालना



सहकारी साखर कारखाना मर्या. रामनगर येथील अनेक कामगारांना भविष्यातील सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेली पेन्शन आणि भविष्य निर्वाह निधीच्या रकमेची विलंबामुळे अडचण निर्माण झाली आहे.

कामगारांच्या मागणीनुसार

नंबर न मिळणे: २०१४ पासून सुरू असलेल्या प्रक्रियेत अनेक कामगारांना अद्याप क्रमांक मिळालेला नाही, यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

थकबाकी रक्कम खात्यात जमा करणे: साखर कारखान्याने २०१० मध्ये भरलेली ₹५,८३,२२,३४२/- ची रक्कम अजूनही कामगारांच्या खात्यात जमा झालेली नाही, ती त्वरित वर्ग करावी. पेन्शन वाढीव मिळण्यासाठी कार्यवाही: न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव पेन्शन मंजूर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही तत्काळ करण्यात यावी. थकबाकी भरपाई: कारखान्याने कर्मचार्यांच्या वेतनातून कपात केलेली रक्कम दंड व

◀◀ पान ३ वर

# नारायणवाडीत विविध गुणदर्शनाने गाजला शिवजन्मोत्सव

## चार गावच्या सहभागातून कार्यक्रमांची व्यापकता

शिरूर । शंकर भालेकर

तालुक्यातील नारायवाडी येथे ग्रामस्थांच्या आयोजनातून याही वर्षी भव्य स्वरूपात शिवजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.यात शालेय विद्यार्थ्यांनी आपापले विविध गुण प्रदर्शन करून संस्कृतिक कार्यक्रमाचे व्यासपीठ गाजवून समाजापुढे शिवजयंती बाबतीत नवा आदर्श ठेवला आहे.





शिरूर कासार तालुक्यातील नारायणवाडी ग्रामस्थांच्या गेल्या दोन वर्षापासून आगळयावेगळया पद्धतीचे शिवजयंतीचे आयोजन केले जात आहे. गत वर्षी प्रमाणे याहीवर्षी नारायणवाडी, जोडवाडी, शास्त्री नगर, भगवान नगर या चार गावच्या सहभागातून भव्य स्वरूपात आयोजन करून सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सर्व गुणसंपन्न व्हावे या उदांत हेतूने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात चारही गावातील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन विविध गुणदर्शनाची धूम उडवून दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावरील गाण्यावर पारंपारिक वेशभूषेतील समूह नृत्याने उपस्थित होते जणांची मन जिंकून टाळ्यांच्या कडकडाटाने दाद मिळवली होती. तर अनेक चिमुकल्या विद्यार्थ्यां सह माध्यमिकच्या विद्यार्थ्यांनी शिवचरित्राचा आपल्या भाषणातून जागर केला. जुन्या- नव्या मराठी हिंदी गीतावरही अनेक विद्यार्थ्यांनी आपले नृत्य सादर करून कार्यक्रमाचा मोठा उत्साह वाढवला होता. सुमारे साडेतीन तास चाललेल्या या कार्यक्रमात उपस्थित प्रेक्षकांकडून टाळ्यांची दाद आणि बक्षिसांचा वर्षाव होत होता. ◀◀ पान ३ वर

### शिवजन्मोत्सव हा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरावा - महंत उद्धव शास्त्री

शिवजन्मोत्सव हा संस्कृतीचा मोठा सण आहे. हा सण ग्रामस्थांनी सुसंस्कारितपणे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शिवजयंतीच्या निमित्ताने अशी विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन गावाला एकत्रित करून जनजागृती केली पाहिजे. नारायणवाडीकरांचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे याचा आदर्श पंचक्रोशीतील गावांनी घेऊन शिवजन्मोत्सवाला सुसंस्कारित व्यापक रूप दिले पाहिजे किंबहुना शिवजन्मोत्सव हा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरावा अशी मनोकामना माऊली संस्थानचे मठाधिपती महंत उद्धव महाराज शास्त्री यांनी यानिमित्ताने व्यक्त केली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शुक्रवार, दि.२१ फेब्रुवारी २०२५ । पान ७

# शिरूर शहर व पंचक्रोशी शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने शिरूर मध्ये ऐतिहासिक शिवशाही मिरवणूक

**शिरूर । प्रतिनिधी**

**वाघनखे नाटकव्याख्यानमहाराष्ट्राचा शाहिरी कार्यक्रम आणि भव्य शिवशाही मिरवणूक. फटाक्यांची आतषबाजी भगव्या झेंड्याची हवेत फिरली शान डीजेचा दणका आणि शिरूर शहर झालं शिवमय शिवशाही मिरवणुकीने शिरूरकराची मने जिंकत जय भवानी जय शिवराय. छत्रपती शिवाजी महाराज की जय या गगनभेदी घोषणे संपूर्ण शिरूर शहर दणाणून गेले होते.**



शिरूर शहर व पंचक्रोशी शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने शिरूर शहरात गेल्या अनेक वर्षापासून शिवजयंती साजरी करण्यात येते. आजही तेवढ्यात उत्साह शिवजयंती साजरी करण्यात आली. परंतु सध्या शिवजयंती चा इतिहास आणि वाढती शिवजयंती आणि नागरिकांचे मन जिंकणाऱ्या मिरवणुकी प्रत्येक वर्षी नवीन आकर्षण ठरत आहे. शिरूर शहर व पंचक्रोशी शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने यंदाच्या वर्षी १६ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध व्याख्याते विठ्ठल खांडगे सर यांचे आजचा युवा उद्याचे भविष्य या विषयावरील व्याख्यान शिरूरकरांची मने जिंकून गेले. तर १७ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा ज्वलंत इतिहास सांगणारे वाघ नखे हे २५ कलाकारांनी सादर केलेले नाटक प्रत्येक शिरूरकरांच्या मनात घर करून गेले. तर १८ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचा शाहीरी बाणा हे प्रसिद्ध युवाशाहीर चंद्रकांत माने व युवा शाहीर ऋतुजा माने यांनी शिरूरकरांची वाहवा मिळवत जय भवानी जय शिवाजी छत्रपती शिवाजी महाराज की जय घोषणा देत उत्साह वाढवला.यावेळी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्तानचे संस्थापक अध्यक्ष श्रमिक चंद्रशेखर गोजंमगुंडे उपस्थित होते.

शिरूर बाजार समिती आवारातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार घालून या छत्रपती शिवाजी महाराज जयंती ची शिवशाही मिरवणुकीत सुरुवात झाली. लहानांपासून मोठ्या पर्यंत प्रत्येकाने एकच ठेका आणि अनेकांच्या हातात भगवे ध्वज नाचत संपूर्ण शिरूर शहरातून ही मिरवणूक निघाली. शहरातील व पंचक्रोशीतील महिला पुरुष लहान बाळांपासून सर्वांनीच या शिवजयंतीचा आनंद घेतला. तर अनेक पालक आपली लहानगी मुलं घेऊन शिवजयंती मिरवणुकीमध्ये मुलांना शिवरायांचा इतिहास शिकवताना व जय भवानी जय शिवराय घोषणा देताना दिसत होते. शिरूर शहर व पंचक्रोशी शिवजयंती समितीच्या कुणाल काळे ,अक्षय ढमढेरे, सुनील इंदुलकर ,सागर परभणे, भूषण थोरात, भूषण खैरे, योगेश फाळके, विकास सांबारे, पराग खराडे, ऋषिकेश गुजर, मोहीत माने,रामराज गवारे, योगेश जामदार, हेमंत नेपाळी,अजिक्य महाजन, भूषण रणदिवे या प्रत्येक कार्यकर्त्यांनी रात्रंदिवस मेहनत करून शिवजयंती यशस्वीपणे पार पाडली आहे.

# कचऱ्याप्रश्नी प्रदूषण महामंडळाची शिरूर नगरपरिषदेला नोटीस

शिरूर: नगरपरिषदेकडून कचर्याचे संकलन व विल्हेवाट शास्त्रशुध्द पध्दतीने केली जात नाही. त्यामुळे या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने पालिकेस नोटीस बजाविण्यात आल्याची माहिती मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष महिबूब सय्यद यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी शिरूर प्रवासी संघाचे अध्यक्ष अनिल बांडे, माधव सेनेचे रवींद्र सानप, मनसेचे तालुका संघटक अविनाश घोगरे, शहराध्यक्ष आदित्य मैड आदी उपस्थित होते.





सय्यद यांनी सांगितले की, शिरूर नगरपरिषदेच्या घन कचरा संकलन केंद्रावर शास्त्रशुध्द पद्धतीने कचरा विल्हेवाट न लावता कचरा जाळल्याने परिसरात वायू प्रदूषण होत असल्याची तक्रार मनसेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ व जिल्हाधिकार्यांकडे केली होती.या तक्रारीची दखल घेत प्रदूषण मंडळाच्या अधिकारी सुषमा कुंभार यांनी कचरा संकलन केंद्रास भेट दिली. तक्रारीची शहानिशा करीत स्थानिक नागरिकांशी चर्चा केली. त्यानंतर या बाबतचा कायदेशीर कार्यवाहीचा अहवाल जानेवारी २०२५ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या उपप्रादेशिक संचालकांना दिला होता. त्या अनुषंगाने प्रदूषण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी जे. एस. साळुंखे यांनी शिरूर नगरपालिकेस नोटीस बजावली आहे.

भविष्यातील घनकचरा प्रक्रियेवरील आढावा सादर करून त्यावरील उपाययोजना संदर्भातील अहवाल १५ दिवसात सादर करावा अन्यथा कारवाई करण्यात येईल, असेही नोटिसीत म्हटले असल्याचे सय्यद यांनी सांगितले.दरम्यान, याबाबत सन २००७ पासून पालिकेकडे तक्रार करूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले असून, शासनाचा निधीचा दुरुपयोग पालिका करीत असल्याचा आरोप सय्यद यांनी या वेळी केला. अनिल बांडे म्हणाले, यासंदर्भात महाराष्ट्र हरित लवादाकडे दाद मागण्यात येणार आहे.

# सावरदरे येथे विहिरीत पडलेल्या बिबट्याला जीवदान

**सारोळा । प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील सावरदरे गावाच्या हद्दीतील शेतकरी कैलास नथुराम साळुंके यांना बिबट्याचे सात महिन्याचे बछडे विहिरीत पडल्याचे आढळून आले. नसरापुर वनविभागाला त्यांनी कळवताच विभागाने बावधन इको रेस्क्यू टिम व सावरदरे सारोळा ग्रामस्थांच्या मदतीने या बछड्याला बाहेर काढले.



सावरदरे येथील शेतकरी कैलास साळुंके यांनी शेतीला पाणी देण्यासाठी विहीरीत डोकावले असता बिबटचा कठड्यावर बसल्याचे दिसले. साळुंके यांनी वनविभागास माहिती कळवली असता. नसरापुर वनपरिक्षेत्र अधिकारी वसंत चव्हाण यांनी बावधन येथील इको रेस्क्यू वन्यजीव बचाव पथकाला याबाबत माहिती देऊन पाचारण केले.

काही वेळातच सर्व वन कर्मचारी तसेच रेस्क्यू पथकाचे प्राणीमित्र व स्थानिक प्राणीमित्र तेथे दाखल झाले. विहिरीत पाळणा सोडून बिबट्याच्या नर जातीच्या बछड्याला सुखरूप बाहेर काढले. या वेळी वनपरिक्षेत्र अधिकारी वसंत चव्हाण यांनी स्थानिकांना जंगली प्राण्यांविषयी माहिती दिली. परिसरातील ऊसतोड मजुरांसह शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी जागरूक राहावे असे आवाहन त्यांनी केले.

त्यावेळी सहाय्यक वन सरंक्षक अधिकारी शितल राठोड ,नसरापुर वनपरिक्षेत्र अधिकारी वसंत चव्हाण यांच्यासह , वनपाल संदिप जोशी वनरक्षक अव्दुत गुजर , वैभव कंक , तुषार कुंभार उपस्थितीत होते. इको रेस्क्यू बावधन पथकाचे हर्षद नागरे यांची टिमने व ग्रामस्थ रूणाल पवार , निलेश गायकवाड , बनी गायकवाड , विलास साळुंके ,जगन्नाथ साळुंके , देवीदास मोरे ,बबन साळुंके यांच्या मदतीने बाहेर काढले.

# उंड्रीतील गोदामावर छापा ६४ लाखांचा गुटखा जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

गुटख्यावर बंदी घातलेली असताना शहरात छुप्या पद्धतीने गुटख्याचे वितरण, तसेच विक्री प्रकरणात काळेपडळ पोलीस, तसेच अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (एफडीए) कारवाई करुन ६४ लाखांचा गुटखा जप्त केला. गुटख्याची वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी चार मालवाहू वाहने (पीकअप) पोलिसांनी जप्त केली आहेत. याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

संपतराज पेमाराम चौहान (वय ३८, रा. कोंढवा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. कारवाईसाठी पोलीस आणि एफडीएचे पथक आल्याची चाहूल लागल्याने गोदामात असलेले तीन ते चार जण पसार झाले. चव्हाण याच्यासह त्याच्याबरोबर असलेल्या चार ते पाच साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अन्न सुरक्षा अधिकारी विजयकुमार उणवने यांनी काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

गोदामाच्या बाहेर गुटख्याची वाहतूक करण्यासाठी चार गाड्या ठेवण्यात आल्या होत्या. पोलिसांनी गोदामातून ६४ लाख ४४ हजारांचा गुटखा आणि १२ लाख रुपयांची चार वाहने असा ७६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काळेपडळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मानसिंग पाटील आणि एफडीएच्या पथकाने ही कारवाई केली.

# नियमांना लाथ मारणाऱ्या उपायुक्तांचा पाय खोलात

**पुणे । प्रतिनिधी**

औंध येथील परिहार चौकात नियमांना ‘लाथ’ मारून ३० पथारी व्यावसायिकांचे पुनर्वसन करणे उपायुक्तांच्या पाय खोलात गेला आहे. यापूर्वी केलेल्या चौकशीच्या अहवालात आणखी दोषारोपांची भर घातली जात असून, खातेनिहाय चौकशीसाठी अधिकारी नियुक्त करण्याचा प्रस्ताव महापालिका आयुक्तांकडे पाठवला आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.



औंध येथील परिहार चौकामध्ये शिवदत्त मिनी मार्केटची जागा नो हॉकर्स झोन म्हणून जाहीर झालेली असताना त्या ठिकाणी ३० व्यावसायिकांचे बेकायदेशीरपणे पुनर्वसन करण्यात आले. शहरात पथारी व्यावसायिकांचे बायोमॅट्रीक सर्वेक्षण बंद असतानाही त्यांना परवाना देण्यात आला आहे. यासंदर्भात तक्रार आल्यानंतर आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांना चौकशी करण्यास सांगितले होते.

त्यात परवाने देताना तत्कालीन उपायुक्तांनी कार्यक्षेत्राच्या बाहेर जाऊन निर्णय घेतला आहे, १५ वर्ष महाराष्ट्रात राहण्याचा पुरावा नसणाऱ्यांनाही परवाने दिल्याचे समोर आले आहे. महापालिका आयुक्त भोसले यांनी याप्रकरणी शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले. तसेच खातेनिहाय चौकशी करण्यासही सांगितले आहे.

हे आदेश देऊन एक महिना होत आला तरीही अद्याप चौकशीसाठी अधिकारी नियुक्त करण्यात आलेला नाही. तसेच अतिक्रमण विभागातील अन्य कर्मचाऱ्यांचीही चौकशी झालेली नाही. यासंदर्भात पृथ्वीराज बी. पी. यांना विचारले असता ते म्हणाले, ‘‘खातेअंतर्गत चौकशी समितीसाठी अधिकारी नियुक्तीचा प्रस्ताव आयुक्तांकडे पाठवला आहे. तसेच उपायुक्तांवर जे दोषारोप केले आहेत, त्यात आणखी वाढ केली जाणार आहे. चौकशी सुरु असताना उपायुक्तांकडी अन्य विभागाचे अधिकारा काढून घेण्याबबत आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल.

# जीबीएसमुळे आणखी दोघांचा मृत्यू; मृतांची संख्या अकरावर

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात गुलेन बॅरे सिंड्रोममुळे (जीबीएस) मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत असून, गेल्या २४ तासात दोन संशयितांच्या मृत्युची नोंद झाली आहे. त्यामुळे मृतांची संख्या आता ११ वर पोहचली आहे. सोमवारी नोंद झालेल्या मृतांमध्ये बारामतीमधील एका २६ वर्षीय मुलीचा समावेश असून, तिच्यावर पुण्यातील रुग्णालयात उपचार सुरू होते. दुसरा मृत्यू पिंपरी-चिंचवडमध्ये झाला आहे. दरम्यान, नवीन बाधित रुग्णांची नोंद झलेली नाही.



मागील दोन दिवसात जीबीएसमुळे मृत्यू होणाऱ्यांची संख्या वाढताना दिसत आहे. मंगळवारी (दि. १८) एका व्यक्तीचा मृत्यू झाला. तर बुधवारी (दि. १९) पुणे महापालिका आणि पिंपरी-चिंचवड कार्यक्षेत्रात प्रत्येकी एक अशा दोन जणांच्या मृत्युची नोंद झाली आहे. एकूण रुग्णांपैकी चार रुग्णांचा जीबीएसमुळे मृत्यू झाल्याचे निश्चित झाले आहे, तर इतर ७ जणांचे मृत्यू संशियीत म्हणून नोंद करण्यात आली आहे.

नोंद झालेल्या मृतांमध्ये २६ वर्षीय मुलगी मूळची बारामती तालुक्यातील असून, पुण्यात सिंहगड रोड परिसरातील एका महाविद्यात ती शिक्षण घेत होती. जानेवारी महिन्यात ती गावी गेली असता तिला त्रास होऊ लागल्याने बारामतीमधील एका खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तिची लक्षणे जीबीएसची दिसून आल्यामुळे २५ जानेवारी रोजी तिला तात्काळ सिंहगड रोड परिसरातील रूग्णालयात दाखल केले. मात्र, मागील आठ दिवसांपासून प्रकृती चिंताजनक होत गेली आणि आज (बुधवारी) उपचारादरम्यान तिची प्राणज्योत मावळली.

दरम्यान, शहरासह जिल्ह्यात आतापर्यंत २११ जीबीएस बाधित सापडले असून, त्यातील १८३ रूग्णांची जीबीएसचे निदान झाले आहे. ३६ रुग्ण आयसीयूमध्ये आणि १६ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. एकूण रुग्णांपैकी पुणे शहर आणि जिल्ह्यात ४२ रुग्ण पुणे महापालिका कार्यक्षेत्रातील आहेत. तर सर्वाधिक रुग्णसंख्या (९४) ही समाविष्ट गावांतील आहे. ३२ रुग्ण पिंपरी-चिंचवड महापालिका, ३३ रुग्ण पुणे ग्रामीण, तर १० रुग्ण इतर जिल्ह्यांतील आहेत.

# काळेपडळ येथे ६६ लाखाचा गुटखा जप्त; म्होरक्या अटक, अन्य साथीदार फरार

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील उंड्री भागात अवैधरीत्या छुप्या पद्धतीने गुटख्याचा साठा करून त्याची विक्री सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. काळेपडळ पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने तब्बल ६६ लाखांचा गुटखा तसेच चार पिकअप पोलिसांनी जप्त केले असून एका आरोपीला अटक केली आहे. ही कारवाई मंगळवारी सायंकाळी करण्यात आली. दरम्यान, या रॅकेटकडून पुणे शहर आणि ग्रामीण भागामध्ये गुटखा विक्रीचे रॅकेट चालवले जात असल्याचा संशय आहे. त्याअनुषंगाने तपास केला जात आहे.



संपतराज पेमाराम चव्हाण (वय-३८, रा. कोंढवा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. चव्हाण याच्यासह त्याच्या सुरेशकुमार पेमाराम भाटी (४०, रा. परिहास चौक, औंध) प्रकाश भाटी, भवर भाटी, निजाम शेख, संदीप ढाका, आशु गुप्ता आणि गुप्ता नावाच्या साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील प्रकाश भाटी आणि निजाम शेख यांच्यावर अगोदर गुन्हे दाखल असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्यांचे रेकॉर्ड शोधण्याचे काम सुरु आहे. याबाबत अन्न सुरक्षा अधिकारी विजयकुमार उनावने यांनी फिर्याद दिली आहे.

राज्यामध्ये गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू व इतर पदार्थाच्या विक्री व वापरास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. असे असले तरी पुण्यात सातत्याने गुटखा वाहतूक आणि विक्री होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यानुसार वारंवार कारवाई देखील केली जात आहे. चोरी-छुप्या पद्धतीने हा व्यवसाय चालतो. दरम्यान, वडाचीवाडी रोड, घुले वस्ती उंड्री या भागात गुटख्याचा साठा असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) पथकाला मिळाली.

त्यानुसार काळेपडळ पोलीस व एफडीएचे अधिकारी यांनी संयुक्तरित्या याठिकाणी छापा टाकला. त्यावेळी गोडाऊनमध्ये विविध प्रकारचा गुटखा, सुगंधित तंबाखू , पान मसाला आढळून आला. पोलीस आल्याची चाहूल लागताच आरोपी पसार झाले. येथून पोलिसांनी संपतराज याला ताब्यात घेतले. गोडाऊनच्या बाहेर मालाची ने आण करण्यासाठी चार गाड्या उभ्या होत्या.

पोलिसांनी या चारही पिकअप जप्त केले आहेत. पथकाने येथून एकूण ६४ लाख ४४ हजारांचा गुटखा आणि १२ लाख रुपये किमतीची वाहने असा ७६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे, काळेपडळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मानसिंग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही कारवाई केली.

# मंचर येथे चोरी करताना दोन महिला सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यात कैद

**मंचर । प्रतिनिधी**

येथे छत्रपती संभाजी महाराज चौकाजवळ असलेल्या स्वामी समर्थ डेअरीच्या दुकानात बुधवारी (ता.१९) दोन महिलांनी तुपाची व मिठाईची पाकिटे आदि दीड हजार रुपये किमतीचे साहित्य हातचलाखी करीत व बोलण्यात गुंतवून ठेवून चोरून नेले आहे. हा प्रकार सी.सी.टी.व्ही. कॅमेरात कैद झाला आहे.



उत्तम टाव्हरे यांच्या दुकानात खाद्य पदार्थ, दुध व दुधापासून तयार केलेले पदार्थ विक्रीसाठी आहेत. दुकानात आलेल्या दोन महिलांनी टाव्हरे यांच्या पत्नी सुरेखा यांच्याकडे पाचशे रुपयाची नोट देत खारी हवी आहे. असे म्हणत एक खारीचा पुडा घेतला. तुमच्याकडे खारी महाग आहे. असे म्हणत पुडा परत देऊन पाचशे रुपये मागे घेतले. सुरेखा यांना संशय आल्याने त्यांनी सी.सी.टी.व्ही. कॅमेरयात पाहणी केली असता. अनेक वस्तू चोरून नेल्याचे दिसून आले. मंचर पोलिसांना सदर प्रकार कळविला आहे. असे उत्तम टाव्हरे यांनी सांगितले

मंचर शहर व परिसरात गेल्या काही दिवसात हातचलाखी करत दुकानांमध्ये चोरी होण्याच्या घटना वाढल्या आहेत. झालेली चोरी किरकोळ असली तरी हा प्रकार गंभीर आहे. दुकानदारांनी काळजी घेऊन सतर्क रहावे. असे आवाहन आंबेगाव तालुका व्यापारी असोसिएशनचे प्रमुख प्रवीण शिंदे यांनी केले.

# खोपोलीत माझी वसुंधरा अभियानांतर्गत उपक्रमांची सुरुवात

खालापूर । प्रतिनिधी

खोपोली नगरपरिषद अंतर्गत माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून खोपोली शहरात रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या हस्ते विविध उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. त्यामध्ये खोपोली अग्निशामक केंद्र येथे ईव्ही चार्जिंग स्टेशन, जून्या मुंबई-पूणे महामार्गाशेजारी बांबू रोपवाटिका, आणि खोपोली नगरपरिषद कार्यालय इमारतीचे आवारात कापडी पिशवी वेंडिंग मशीन आदी उपक्रमांचा समावेश आहे.

खोपोली नगरपरिषदेच्या सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात खोपोली नगरपरिषद हद्दीतील सर्व मिळकतीचे सविस्तर नगरभूमापन करून मिळकतीचे नकाशे व मिळकत पत्रिका तयार करण्यासाठी केंद्र शासनाने कार्यान्वीत केलेल्या प्रकल्पाचा शुभारंभ आणि दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, त्याचप्रमाणे इतर योजनांची माहिती महिला बचत गटांना जिल्हाधिकारी जावळे यांच्या यावेळी दिली.

तसेच पीएम स्वनिधी योजने अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या महिला बचत गटांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी रायगड जिल्हा प्रशासन अधिकारी श्याम पोशेट्टी, भूमि अभिलेख कोकण प्रदेशचे उपसंचालक अनिल माने, रायगड भूमि अभिलेख अधीक्षक सुनील इंदलकर, खालापूर भूमी अभिलेख उपअधीक्षक प्रमोद जरग, खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील आणि अन्य प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# फटाके फोडणाऱ्या बुलेट चालकांवर कारवाई; खराडी पोलिसांच्या कारवाईत ४५ हजार दंड वसूल

**वडगाव शेरी । प्रतिनिधी**

खराडीच्या रस्त्यावर सुसाट वेगाने बुलेट चालवून सायलेन्सर मधून फटाक्याचा आवाज काढणाऱ्या टुकार 'बुलेट राजां'मुळे रहिवासी, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले त्रस्त झाले आहेत. अशा रोड रोमियोंना ११ बुलेट ताब्यात घेऊन त्यांना ४५ हजार रुपयांचा दंड खराडी पोलिसांनी वसूल केला.




खराडी येथील ईवान आयटी पार्क परिसरात शेकडो मोठ्या गृहरचना संस्था आहेत. येथे मागील काही महिन्यांपासून सायंकाळनंतर रात्री उशिरापर्यंत काही बुलेट स्वार त्यांच्या वाहनाच्या सायलेन्सर मधून फटाक्यासारखा मोठा आवाज काढतात. काही बुलेट स्वारांच्या सायलेन्सरचा आवाज तर कानठळ्या बसवणारा आहे.

या रोड रोमिओंनी त्यांच्या बुलेटच्या सायलेन्सरमध्ये बेकायदा फेरबदल केले आहेत. त्यामुळे आवाज ऐकून रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांना धडकी भरते. तसेच रात्री उशिरा कानठाळ्या बसवणाऱ्या आवाजामुळे लहान मुले झोपेतून डचकून उठतात. या बुलेट स्वारांवर कारवाई करण्याविषयी खराडीतील रहिवासी सातत्याने मागणी करीत होते. त्यामुळे खराडी पोलिसांनी बुधवार (ता १९) रोजी विशेष मोहीम राबवून फटाके वाजवणाऱ्या, नंबर प्लेट नसलेल्या, सायलेन्सर मध्ये बेकायदा बदल केलेल्या अकरा बुलेट चालकांना ताब्यात घेतले. या बुलेट चालकांनी त्यांचे बेकायदा सायलेन्सर काढून योग्य सलेन्सर लावले, योग्य नंबर प्लेट लावल्यानंतर ४५ हजार दंड करून त्यांना सोडण्यात आले.